सांगं, मी तुमले सत्य सांगस की, जकातदार अनं वेश्या तुमनापुढे देवना
राज्यमा जातस. 32 ✡कारण योहानननी तुमले देवराज्यना मार्ग दखाडा
अनं तुम्हीन त्याना ईश्वास करा नहीं; पण जकातदार अनं वेश्या यासनी
त्यानावर ईश्वास करा; हाई दखीसन सुध्दा तुम्हीन त्याना ईश्वास करा
नही अनी पश्चाताप बी करा नही.

### द्राक्षमयाना दृष्टांत

*(मार्क १२:१-१२; लूक २०:९-१९)*

33 आखो एक दृष्टांत ऐकी ल्या, एक माणुस व्हता, त्यानी द्राक्षमया
बनाडा, त्याना आजुबाजू वडांग करी, त्यामा द्राक्षरसकरता कुंडी बनाडी
अनं माळा बांधा अनी दुसरा शेतकरीले बटाईवर सोपीन परदेशले निंघी
गया. 34 नंतर फळसना हंगाम वना तवय त्यानी आपला उत्पन्नना वाटा
लेवाकरता आपला दाससले त्या शेतकरीकडे धाडं. 35 तवय शेतकरीनी
त्याना काही दाससले धरीन मारं, काही जणसले दगडमार करा अनं
काही जणसले मारी टाका. 36 परत त्यानी पहिलापेक्षा जास्त दाससले
धाडं; त्यासनासंगे बी त्यासनी तसच करं. 37 शेवट त्या आपला
पोऱ्याना तरी मान ठेवतीन म्हणीन त्यानी स्वतःना पोऱ्याले त्यासनाकडे
धाडं; 38 पण त्या शेतकरीसनी त्याले दखं अनं त्या एकमेकसले
बोलणात, हाऊ वारीस शे; चला आपण याले मारी टाकुत म्हणजे मळाना
मालक आपण व्हसुत. 39 तवय त्यासनी त्याले धरीन द्राक्षमयाना बाहेर
काढीन मारी टाकं. 40 येशुनी त्यासले ईचारं, तर मंग द्राक्षमयाना मालक
ई तवय तो त्या शेतकरीसनं काय करी? 41 त्या त्याले बोलणात, तो
त्या दुष्टसना हालहाल करीसन त्यासना नाश करी अनी ज्या शेतकरी
हंगाममा त्याले ईमानदारीमा उत्पन्न देतीन असासले तो द्राक्षमया सोपी
दि. 42 येशु त्यासले बोलणा, ज्या दगडले बांधणारासनी नापसंत करा
तोच कोणशीला व्हयना; हाई प्रभुकडतीन व्हयनं, अनं हाई आमना
दृष्टीमा आश्चर्यकारक कृत्य शे; अस पवित्र शास्त्रमा तुमना वाचामा वनं
नही का? 43 यामुये मी तुमले सत्य सांगस की, देवनं राज्य तुमनापाईन
हिसकाई लेतीन; अनं जी प्रजा त्यानं फळ दि, त्याच प्रजाले देवनं राज्य
भेटी. 44 जो ह्या दगडवर पडी त्याना चुराडा व्हई, पण ज्यानावर
हाऊ दगड पडी त्याना भुगा-भूगा करी टाकी.† 45 येशु हाऊ दृष्टांत
आपले लाईनं बोलना हाई मुख्य याजक अनं परूशीसना ध्यानमा वनं.
46 त्या त्याले धराले दखी राहींतात पण लोकसनी गर्दीनी त्यासले भिती
वाटणी; कारण त्या त्याले संदेष्टा मानेत.

# 22

### लगीनना जेवणना दृष्टांत

*(लूक १४:१५-२४)*

1 येशु परत त्यासले दृष्टांत दिसन बोलना; 2 स्वर्गनं राज्य एक राजाना
मायक शे, त्यानी त्याना पोऱ्याना लगीननं जेवण दिधं; 3 अनी लगीनना
जेवणकरता ज्यासले निवतं देयल व्हतं त्यासले बलावाकरता त्यानी
त्याना सेवकसले धाडं, पण त्या ई नहीं राहींतात. 4 परत त्यानी दुसरा
सेवकसले धाडीन सांगं, की, निमंत्रीत लोकसले सांगा, दखा, मी जेवण
तयार करेल शे, मना बोकड्या अनं कोंबड्या कापाई जायेल शेतस, सर्व
तयार शे, लगीनना जेवणले चला. 5 तरी हाई त्यासनी मनवर नही
लिधं अनी त्या काहीजण वावरमा, काहीजण व्यापारले निंघी गयात.
6 बाकीना निवतं मिळेल लोकसनी राजाना दाससले धरीन, त्यासना
छळ करीसन मारी टाकात. 7 तवय राजाले राग वना; अनी त्यानी
आपला सैन्यले धाडीसन त्या घातकीसना नाश करा अनी त्यासना शहर

✡ **21:21** २१:२१ मत्तय १७:२०; १ करिंथ १३:२ ✡ **21:32** २१:३२ लूक ३:१२; ७:२९,३० † **21:44** २१:४४ जो ह्या दगडवर पडी त्याना चुराडा व्हई, पण ज्यानावर हाऊ दगड पडी त्याना भुगा-भूगा करी टाकी. हाई वचन जुना शास्त्रसमा वाचाले मिळस नही.

जाळी टाकं. 8 मंग तो आपला दाससले बोलना, लगीननी तयारी व्हई
जायेल शे, हाई खरं, पण आमंत्रित योग्य नव्हतात. 9 म्हणीन तुम्हीन
बाहेर रस्तासवर जा अनी जितला तुमले दखायतीन तितलासले लगीनना
जेवणकरता बलाई आणा. 10 मंग त्या दाससनी रस्तावर जाईन ज्या बी
त्यासले बरा वाईट भेटणात, त्या सर्वासले एकत्र करा अनी जेवाकरता
येल आमंत्रितसघाई लगीनघर भरी गयं. 11 राजा जेवणारासले दखाले
वना, तवय तठे लगीनना कपडा घालीन येल नही असा एक माणुस
त्याले दखायना. 12 तवय तो त्याले बोलना, दोस्त, तु लगीनना कपडा
न घालता आठे कशा काय वना? त्यानी काहीच उत्तर दिधं नही.
13 ✡मंग राजानी सेवकसले सांगं, याना हात पाय बांधीन याले अंधारमा
टाका, तठे रडणं अनी दातखाणं चालस. 14 बलायेल बराच शेतस, पण
निवडेल थोडाच शेतस.

### कैसर राजाले कर देवाबद्दल प्रश्न

*(मार्क १२:१३-१७; लूक २०:२०-२६)*

15 मंग परूशीसनी जाईन आपसमा चर्चा करी की, येशुले त्यानाच
बोलानामा कश फसाडानं 16 याकरता त्यासनी आपला शिष्यसले हेरोदी
पक्षना लोकससंगे त्यानाकडे धाडीन सांगं, गुरजी, आमले माहित शे की,
तुम्हीन खरा शेतस, देवना मार्ग खरापणतीन सांगतस, तुम्हीन मनुष्यसनं
मत अनी ईच्छासघाई प्रभावित होतस नही, कारण तुम्हीन लोकसनं
तोंड दखीन बोलतस नही. 17 तुमले काय वाटस हाई आमले सांगा,
कैसरले कर देवाणा हाई योग्य शे की नही? 18 येशु त्यासना मनमाधलं
कपट वळखीन बोलना, अरे ढोंगीसवन का बर मनी परिक्षा दखतस?
19 कर देतस ते नाणं दखाडा; तवय त्यासनी त्यानाजोडे एक नाणं अनी
दिधं. 20 त्यानी त्यासले ईचारं, यावर कोणं चित्र अनं लेख शे? 21 त्या
बोलनात, रोमना राजानं; येशुनी त्यासले सांगं, तर मंग राजानं शे, ते
राजाले अनी देवना शे, ते देवले भरी घा. 22 हाई ऐकीन त्यासले आश्चर्य
वाटणं अनी त्या त्याले सोडीन गयात.

### पुनरूत्थानना प्रश्न

*(मार्क १२:१८-२७; लूक २०:२७-४०)*

23 ✡त्याच दिनले, पुनरूत्थान व्हस नही, असा म्हणनारा सदुकी
पंथना लोकसनी त्यानाकडे ईसन ईचारं, 24 गुरजी, मोशेनी सांगेल
शे की, जर एखादा माणुस लेकरं-बाळ न व्हताच मरी गया तर
त्याना भाऊनी त्याना बायकोसंगे लगीन करीसन आपला भाऊना वंश
चालावाना; 25 आमनामा सात भाऊ व्हतात; त्यामधला पहिला लगीन
करीसन मरी गया अनी त्याले लेकरं नव्हतात म्हणीन त्यानी बायकोसंगे
त्याना भाऊनी लगीन करं 26 तसाच दुसरा, तिसरा, असा सातही जण
तिनासंगे लगीन करीसन मरी गयात; 27 अनी सर्वासनंतर ती बाई पण
मरी गयी. 28 मंग जवय पुनरूत्थान व्हई तवय ती त्या सात जणसपैकी
कोणी बायको व्हई? कारण ती त्या सर्वासनी बायको व्हयेल व्हती.
29 येशुनी त्यासले उत्तर दिधं; तुम्हीन शास्त्र अनी देवना सामर्थ्यले
समजनात नही म्हणीन तुम्हीन भ्रममा पडेल शेतस. 30 कारण पुनरूत्थान
व्हवानंतर त्या लोके लगीन करतस नही अनं करी बी देतस नही, तर त्या
स्वर्गमधला देवदूतसना मायक राहतस. 31 मरेलसना पुनरूत्थानबद्दल
देवनी तुमले सांगं, ते तुमना वाचामा वना नही का? 32 ✡ते अस की,
“मी अब्राहामना देव, इसहाकना देव अनं याकोबना देव शे.” देव
मरेलसना नही तर जिवतसना देव शे. 33 हाई ऐकीन लोकसनी गर्दीले
त्याना शिक्षणनं आश्चर्य वाटणं.

### सर्वात मोठी आज्ञाना प्रश्न

*(मार्क १२:२८-३४; लूक १०:२५-२८)*

34 त्यानी सदुकी लोकसनं तोंड बंद करी टाकं हाई ऐकीन परूशी
लोके जमनात; 35 अनी त्यामातीन शास्त्रीसनी त्यानी परिक्षा दखाकरता
एक प्रश्न ईचारा; 36 गुरजी, नियमशास्त्रमा सर्वसमा मोठी आज्ञा कोणती
शे? 37 येशु त्याले बोलना, तु आपला देव परमेश्वर यानावर पुर्ण
हृदयतीन, पुर्ण जिवतीन अनं पुर्ण मनतीन प्रिती कर. 38 हाईच पहिली
अनं मोठी आज्ञा शे. 39 ईनामायकच आखो एक दुसरी आज्ञा अशी शे
की, तु स्वतःवर करस तशी आपला शेजारीसवर प्रिती कर. 40 ✡ह्या
दोन आज्ञासवरच सर्व नियमशास्त्र अनी संदेष्टासनं शास्त्र ह्या अवलंबीन
शेतस.

### ख्रिस्त कोणा पोर्‍या शे?

*(मार्क १२:३५-३७; लूक २०:४१-४४)*

41 परूशी लोके एकत्र जमनात तवय येशुनी त्यासले ईचारं;
42 ख्रिस्तबद्दल तुमले काय वाटस? तो कोणा पोर्‍या शे? त्यासनी
त्याले उत्तर दिधं, दावीदना पोर्‍या शे. 43 येशुनी त्यासले सांगं, तर मंग
दावीदनी पवित्र आत्माना प्रेरणातीन त्याले “प्रभु” अस कसं म्हणं? तो
म्हणस, 44 ✡परमेश्वरनी मना प्रभुले सांगं, मी तुना शत्रुले तुना पायसनं
आसन करस तोपावत तु मना उजवीकडे बस. 45 दावीद जर त्याले प्रभु
म्हणस तर तो दावीदना पोर्‍या कशा काय व्हई? 46 तवय कोणलेच
त्याले उत्तर देता वनं नही; अनी त्या दिनपाईन त्याले आखो काही
ईचारानी कोणीच हिम्मत व्हईनी नही.

# 23

### येशु शास्त्री अनं परूशीसना जाहीरपणे निषेध करस

*(मार्क १२:३८,३९; लूक ११:४३,४६; २०:४५,४६)*

1 तवय येशु, लोकसनी गर्दीले अनी त्याना शिष्यसले बोलना,
2 शास्त्री अनं परूशी या मोशेना आसनवर बठेल शेतस. 3 यामुये त्या
जे काही तुमले सांगतीन ते पाळा अनं तस वागा, पण त्या जश करतस
तस करू नका; कारण त्या जे सांगतस ते करतस नही, 4 त्या जड
ओझं बांधीन लोकसना खांदावर टाकतस, पण त्या स्वतः त्याले बोट बी
लावतस नही; 5 ✡अनी त्या आपला सर्वा कामे लोकसले दखाडाकरता
करतस, त्या आपला ताईत मोठा बनाडतस अनं आपला कपडासना
किनारले गोंडा लाईन आम्हीन भलता पवित्र शेतस असा दखाडतस.
6 पंगतमा मुख्य स्थान अनं सभास्थानमा मुख्य आसन, 7 बजारमा
लोकसकडतीन आदर करी लेवाणं अनं स्वतःले गुरजी, अस म्हणी
लेवाणं हाई त्यासले आवडस 8 तुम्हीन स्वतःले लोकसकडतीन गुरजी
म्हणी लेवु नका; कारण तुमना गुरू एक शे अनं तुम्हीन सर्व भाऊ-भाऊ
शेतस. 9 जगमा कोनले बी पिता म्हनान नही, कारण तुमना पिता एकच
शे अनं तो स्वर्गामा शे. 10 तसच तुम्हीन स्वतःले स्वामी म्हणी लेवु नका
कारण तुमना एकच स्वामी शे, तो म्हणजे ख्रिस्त शे. 11 ✡तुमनामा जो
मोठा शे त्यानी तुमना सेवक व्हवाले पाहिजे. 12 ✡जो कोणी स्वतःले

---

✡ **22:13** २२:१३ मत्तय ८:१२; २५:३०; लूक १३:२८ ✡ **22:23** २२:२३ प्रेषित २३:८ ✡ **22:32** २२:३२ निर्गम ३:६,१५-१६ ✡ **22:40** २२:४० लूक १०:२५-२८ ✡ **22:44** २२:४४ स्तोत्रसंहिता ११०:१ ✡ **23:5** २३:५ मत्तय ६:१ ✡ **23:11** २३:११ मत्तय २०:२६,२७; मार्क ९:३५; १०:४३,४४; लूक २२:२६ ✡ **23:12** २३:१२ लूक १४:११; १८:१४

मोठा माणुस समजी, त्याले सर्वात खालना माणुस म्हणतीन, अनी जो
कोणी स्वतःले लिन नम्र बनाडी त्या माणुसले मोठा म्हणतीन.

### येशु ढोंगीपननी निंदा करस

*(मार्क १२:४०; लूक ११:३९-४२,४४,५२; २०:४७)*

13 अरे शास्त्री अनं परूशीसवन, अरे ढोंगीसवन, तुमना धिक्कार
असो! कारण लोकसनी मझार जावाले नको म्हणीन तुम्हीन स्वर्गना
राज्यनं दार बंद करतस; तुम्हीन स्वतःबी मझार जातस नही अनी मझार
जाणारासले बी जाऊ देतस नही. 14 *अरे शास्त्री अनी परूशीसवन,
अरे ढोंगीसवन, तुमना धिक्कार असो! कारण तुम्हीन विधवासना
घरसना नुकसान करी टाकतस अनं दिखावाकरता मोठी प्रार्थना करतस,
यामुये तुमले सर्वात जास्त भोग भोगना पडी. 15 अरे शास्त्रीसवन अनं
परूशीसवन, अरे ढोंगीसवन, तुमना धिक्कार असो! कारण तुम्हीन
एक शिष्य बनाडाकरता जमीन अनं समुद्र पालथा घालतस अनी तो
भेटना तर तुम्हीन त्याले स्वतःपेक्षा दुप्पट नरकना भागीदार बनाडतस.
16 अरे वाट दखाडणारा आंधयासवन, तुमना धिक्कार असो! कारण
तुम्हीन म्हणतस, कोणी मंदिरनी शप्पथ लिधी तरी काही हरकत नही
पण मंदिरमा जे सोनं शे, त्यानी शप्पथ लिधी तर ती मोडता येवाव
नही. 17 अरे मुर्ख अनं आंधया लोकसवन, मोठं काय शे, ते सोनं
की ज्यामुये ते सोनं पवित्र व्हयेल शे ते मंदिर? 18 तुम्हीन म्हणतस
कोणी वेदीनी †शप्पथ लिधी तर काहीच हरकत नही, पण जर कोणी
तिनावर अर्पण करतस त्या अर्पणनी शप्पथ लिधी तर ती मोडता येवाव
नही. 19 अरे आंधयासवन, मोठं काय शे; अर्पण की, अर्पणले पवित्र
करस ती वेदी? 20 पण जो कोणी वेदीनी शप्पथ लेस तो तिनी अनी
तिनावर जे काही ठेयल शे त्यानी शप्पथ लेस; 21 अनी जो कोणी
मंदिरनी अनं त्यामा राहणारा देवनी शप्पथ लेस; 22 ✡अनी जो स्वर्गनी
शप्पथ लेस तो देवना सिंहासन नी अनी त्यावर जो बठस त्यानी बी
शप्पथ लेस. 23 अरे शास्त्री अनं परूशीसवन, अरे ढोंगीसवन, तुमना
धिक्कार असो! कारण पुदिना, सौफ अनी जिरा याना दशांश तुम्हीन
देतस अनी नियमशास्त्रमाधल्या मुख्य गोष्टी म्हणजे न्याय, दया अनं
ईश्वास यासले तुम्हीन धाकल्या गोष्टी समजीन सोडी दिध्यात; ह्या गोष्टी
कराले पाहिजे व्हत्यात, तसच आखो महत्वन्या गोष्टी शेतस त्यासले पण
तुम्हीन सोडी देऊ नका. 24 अरे आंधळी वाट दखाडनारासवन, तुम्हीन
मच्छरले निवडीन काढतस अनं उंटले गिळी टाकतस. 25 अरे शास्त्री
अनं परूशीसवन, अरे ढोंगीसवन तुमना धिक्कार असो! तुम्हीन बी
आपली ताटवाटी बाहेरतीन घाशीन पुशीन स्वच्छ करतस पण मझारमा
हावरटपणा अनं जुलूम यासनी घाण भरी ठेयल शे. 26 अरे आंधळ्या
परूशी, पहिले वाटी मझारतीन साफ करा, म्हणजे ती बाहेरतीन साफ
व्हई. 27 ✡अरे शास्त्रीसवन अनं परूशीसवन, अरे ढोंगीसवन, तुमना
धिक्कार असो! कारण तुम्हीन चुना लायेल कबरसनामायक शेतस,
त्या बाहेरतीन सुंदर दखातस, पण मझारतीन मरेलसना हाडसनी अनं
सर्व प्रकारना घाणनी भरेल शेतस; 28 तस तुम्हीन बाहेरतीन लोकसले
न्यायी दिसतस, पण मझारतीन ढोंग अनं अधर्मनी भरेल शेतस.

### येशुनाद्वारा त्यासनी शिक्षा

*(लूक ११:४७-५१)*

29 अरे शास्त्री अनं परूशीसवन, अरे ढोंगीसवन, तुमना धिक्कार
असो! कारण तुम्हीन संदेष्टासना कबरी बांधतस अनं साधु संतना
कबरसले तुम्हीन सजाडतस. 30 अनी म्हणतस आम्हीन आमना
वाडवडीलसना काळमा त्यासनासंगे राहतुत तर संदेष्टासनी हत्या करामा
आम्हीन त्यासले साथ नही देतुत. 31 यावरतीन तुम्हीन स्वतःच सांगतस
की, तुम्हीन संदेष्टासनी हत्या करनारासना पोऱ्या शेतस; 32 तुम्हीन,
तुमना पुर्वजसनी जी वाईट करणी करीसन आर्ध माप भरेल शे, ते तुम्हीन
दुष्टाई करीसन पुरं भरी टाका. 33 ✡अरे सापसवन, सापसना पिल्लसवन
नरकमा जावानी शिक्षा तुम्हीन कशी चुकाडशात? 34 म्हणीन दखा, मी
तुमनाकडे संदेष्टासले, ज्ञानी लोकसले अनं शास्त्री यासले धाडसु; तुम्हीन
त्यामाधला कित्येक जणसले मारी टाकशात अनं काहीसले क्रुसखांबवर
खियासघाई ठोकीन मारशात अनी बाकीनासले तुमना सभास्थानमा
फटका मारशात अनं प्रत्येक शहरमा त्यासले त्रास देत फिरशात.
35 अनी जितला न्यायी लोकसनं रंगत पृथ्वीवर व्हावाडेल शे ते
तुमना माथे पडी, याना अर्थ न्यायी हाबेल पाईन तर बरख्याना पोऱ्या
जखऱ्या पावत, ज्यासले तुम्हीन मंदिर अनी वेदीना मझार मारी टाकेल
शे. 36 मी तुमले सत्य सांगस, की ह्या सर्वा गोष्टी हाई पिढीना माथे
पडीतीन.

### यरूशलेम शहरबद्दल येशुनी कळकळ

*(लूक १३:३४,३५)*

37 "यरूशलेमा, यरूशलेमा, तु संदेष्टासले मारी टाकस अनी ज्यासले
तुनाकडे धाडतस त्यासले तु दगडमार करस, मनी कितलींदाव ईच्छा
व्हती की, जशी कोंबडी तिना पिल्लासले आपला पंखखाल गोळा
करस तसच मी बी तुना पोऱ्यासले गोळा करसु," पण तुनी ईच्छा
नव्हती! 38 म्हणीन आते तुमनं घर ओसाड अवस्थामा तुमलेच सोपी
देयल शे. 39 मी तुमले सांगस की, आत्तेपाईन "प्रभुना नावतीन येणारा
तो आशिर्वादित शे, अस म्हणशात तोपावत मी तुमना नजरमा पडावु
नही."

## 24

### येशु मंदिरना विनाशबद्दल भविष्य करस

*(मार्क १३:१,२; लूक २१:५,६)*

1 मंग येशु मंदिरमातीन बाहेर निंघी राहींता तवय त्याना शिष्य त्याले
मंदिरनी माडी दखाडासाठे त्यानाजोडे वनात. 2 तवय येशु त्यासले
बोलना, "हाई सर्व तुम्हीन दखी राहीनात ना. मी तुमले खरं सांगस की;
असा आठे दगडवर दगड ऱ्हावाव नही; जो पाडता येवाव नही."

### दुःख अनी तरास

*(मार्क १३:३-१३; लूक २१:१-१९)*

3 येशु जैतुनना डोंगरवर बशेल व्हता तवय त्याना शिष्यसनी
त्यानाकडे ईसन ईचारं, "ह्या गोष्टी कवय व्हतीन अनी तुमनं येवानं
अनी ह्या युगना समाप्तीनं चिन्ह काय शे, हाई आमले सांगा."
4 येशुनी त्यासले उत्तर दिधं, तुमले कोणी फसाडाले नको म्हणीन
जपी ऱ्हा. 5 कारण बराच लोके मनं नाव लिसन येतीन अनी मी
ख्रिस्त शे अस म्हणतीन अनी बराच जणसले फसाडतीन. 6 जवय
तुम्हीन लढायासबद्दल ऐकशात अनी लढायासन्या अफवा ऐकशात
तवय संभाळा घाबरू नका कारण अस व्हवानं आवश्यकच शे, पण
तेवढामा शेवट व्हवाव नही. 7 कारण राष्ट्रसवर राष्ट्र अनं राज्यसवर राज्य

* 23:14 २३:१४ हाई वचन काही शास्त्रमा नही मिळस † 23:18 २३:१८ वेदी होमकुंड ✡ 23:22 २३:२२ मत्तय ५:३४ ✡ 23:27 २३:२७ प्रेषित २३:३ ✡ 23:33 २३:३३ मत्तय ३:७; १२:३४; लूक ३:७

ऊठतीन अनी जागोजागी दुष्काळ पडी अनं भूकंप व्हतीन. 8 पण हाई
सर्व म्हणजे दुःखनी सुरवात शे.
9 ✡तुमना हाल कराकरता त्या तुमले धरी देतीन अनं तुमले मारी
टाकतीन अनी मना नावमुये सर्वा लोके तुमना तिरस्कार करतीन. 10 त्या
येळले बराचजन अडखळतीन; त्या एकमेकसले धरी देतीन, अनं
एकमेकसना व्देष करतीन; 11 बराच खोटा संदेष्टा व्हतीन अनी बराच
जणसले फसाडतीन. 12 अनी अधर्म वाढामुये बराच लोकसनी प्रिती
थंडी व्हई जाई. 13 ✡पण ह्यामा शेवटपावत जो टिकी राही त्यानच
तारण व्हई. 14 जगमाधला सर्व लोकसकरता साक्ष व्हवाले पाहिजे
म्हणीन देवराज्यनी हाई सुवार्ता सर्व जगमा गाजाडतीन; तवय शेवट
व्हई.

### महासंकटना काळ

*(मार्क १३:१४-२३; लूक २१:२१-२४)*

15 "दानीएल संदेष्टाद्वारा सांगेल,* बठं काही उध्वस्त करणारी
अमंगळताले पवित्रस्थानमा उभा राहेल तुम्हीन दखशात." 16 "तवय
ज्या यहूदीया प्रांतमा व्हतीन त्यासनी डोंगरकडे पळी जावानं. 17 ✡जो
धाबावर व्हई त्यानी आपला घरमातील काही बी बाहेर काढाकरता
खाल उतरानं नही. 18 अनी जो वावरमा राही त्यानी आपला कपडा
लेवाकरता मांगे फिरीन येवानं नही. 19 त्या दिनसमा ज्यासले दिन
राहतीन अनी ज्या लेकरंसले पाजणाऱ्या राहतीन त्यासना भयंकर हाल
व्हतीन! 20 तरी हिवाळामा किंवा शब्बाथ दिनले तुमले पळनं पडाव
नही म्हणीन प्रार्थना करा! 21 ✡कारण जगना उत्पत्तिपाईन ते आजपावत
वनं नहीं अनं येवाव नही, अस मोठं संकट त्या काळमा ई. 22 अनी देव
त्या दिनसले थोडा नही करता तर; कोणताच माणुसना निभाव लागता
नही, पण ज्यासले निवडेल शे त्यासनाकरता त्या दिन थोडा कराई
जातीन."
23 त्या येळले कोणी तुमले म्हणी, "दखा, ख्रिस्त आठे शे! किंवा
तठे शे!" तर खरं मानु नका. 24 कारण खोटा ख्रिस्त अनी खोटा
संदेष्टा व्हतीन; त्या असा मोठा चिन्ह अनं चमत्कार दखाडतीन की
ज्यासले देवनी निवडेल शे त्यासले सुध्दा फसाडतीन. 25 दखा! मी
हाई पहिलेच तुमले सांगीन ठेयेल शे.
26 ✡"किंवा, जर कोणी तुमले म्हणी, 'दखा, तो जंगलमा शे!' तर
तठे जावु नका; अनी कोणी म्हणी, 'दखा, तो मझारनी खोलीमा शे!' तर
खरं मानु नका. 27 कारण जशी ईज पुर्व दिशाकडतीन निंघीन पश्चिम
दिशापावत चमकस तसं मनुष्यना पोऱ्यानं येणं व्हई."
28 ✡जठे प्रेत शे, तठे गिधाड जमतीन.

### मनुष्यना पोऱ्या येशु यानं परत येणं

*(मार्क १३:२४-२७; लूक २१:२५-२८)*

29 ✡"त्या दिनसमाधला संकटना मांगतीन लगेच सुर्य अंधकारमय
व्हई, चंद्र प्रकाश देवाव नही, तारा आकाशमातीन नष्ट व्हतीन अनी
आकाशमाधली शक्ती हाली जाई. 30 ✡तवय मनुष्यना पोऱ्यानं चिन्ह
आकाशमा दखाई; अनी पृथ्वीवरला सर्व जातना लोके शोक करतीन
त्या मनुष्यना पोऱ्याले आकाशना ढगसवर बशीसन, पराक्रमतीन अनी
मोठा वैभवतीन येतांना दखतीन. 31 तुतारीसना महानादनासंगे, मी मना
दूतसले धाडसु, अनी त्या पृथ्वीना एक टोकपाईन दुसरा टोकपावत मना
निवडेल लोकसले चाऱ्ही दिशाकडतीन गोया करसु."

### अंजिरनं झाडना दृष्टांत

*(मार्क १३:२८-३१; लूक २१:२९-३३)*

32 "आते अंजिरना झाडना दृष्टांत ल्या, त्याले कवळी फांदी ईसन
पानटा फुटू लागणात म्हणजे उन्हाळा जोडे येल शे अस तुमले समजस.
33 जवय तुम्हीन ह्या सर्व गोष्टी दखशात, तवय मी दारजोडे शे, अस
समजा. 34 मी तुमले सत्य सांगस, जोपावत हाई सर्व पुरं व्हत नही
तोपावत हाई पिढीना अंत व्हवाव नही. 35 आकाश अनी पृथ्वी पुसाई
जाई, पण मनं वचन पुसावणारच नही."

### कोणलेच तो दिन अनी येळ माहीत नही

*(मार्क १३:३२-३७; लूक १७:२६-३०,३४-३६)*

36 "त्या दिनबद्दल अनी त्या येळबद्दल कोणलेच माहीत नहीं, स्वर्ग
माधला देवदूतसले नही, देवना पोऱ्यालेसुध्दा नही; फक्त देवबापलेच
माहीत शे. 37 नोहाना दिनसनामायक मनुष्यना पोऱ्यानं येणं व्हई.
38 तवय जस जलप्रलय येवाना पहीलेना दिनसमा नोहा जहाजमा जास
नही तोपावत लोके खाइ पी राहींतात, लगीन करी ली राहींतात,
लगीन करी दी राहींतात; 39 तवय जलप्रलय ईसन त्यासले वाहीन
लई गया तोपावत त्यासले समजनं नही, तसच मनुष्यना पोऱ्यानं येणं
व्हई. 40 त्या येळले वावरमा काम करनारा दोन जणसमातीन; एक
उचलाई जाई अनी एक तठेच ठेवाई जाई. 41 जातावर दळनाऱ्या दोन
बायासपैकी एक उचलाई जाई अनं एक तठेच ठेवाई जाई. 42 यामुये,
जागृत ऱ्हा, कारण कोणता दिनले तुमना प्रभु ई हाई तुमले माहीत नही.
43 ✡आखो, हाई समजी ल्या की, कोणता येळले चोर येवाव शे हाई जर
घरमालकले माहीत ऱ्हातं, तर तो जागा ऱ्हाता अनी आपलं घर चोरले
फोडु नही देता. 44 यामुये तुम्हीन तयार ऱ्हा, तुमले वाटाव नही त्या
येळले मनुष्यना पोऱ्या ई."

### ईश्वासु किंवा अईश्वासु दास

*(लूक १२:४१-४८)*

45 असा ईश्वासु अनं ईचारशील कारभारी कोण शे? ज्याले त्याना
मालक आपला सेवकसवर अधिकारी नेमी यानाकरता की, तो त्यासले
येळवर जेवण दी. 46 मालक ई तवय जो दास तसं करतांना त्याले
दखाई, तो दास धन्य! 47 मी तुमले सत्य सांगस की, मालक त्या
दासले आपली सर्व मालमत्तावर अधिकारी नेमी. 48 पण जर तो दुष्ट
दास व्हई तर तो आपला मनमा म्हणी, मना मालकले येवाले आखो
बराच येळ लागी. 49 अनी तो आपला सोबतना दाससले मारू लागना
अनं दारूड्याससंगे खाऊ पिऊ लागना, 50 तवय दास मालकनी वाट
दखत नही त्या दिनले अनी त्याले माहीत नही त्या येळले त्याना मालक
ईसन, 51 त्या दासले कापी टाकी अनी ढोंगीसनासंगे त्याले टाकी दी.
तठे रडनं अनी दात खानं चाली

# 25

### दहा कुवारीसना दृष्टांत

✡ **24:9** २४:९ मत्तय १०:२२ ✡ **24:13** २४:१३ मत्तय १०:२२ * **24:15** २४:१५ वाचनारानी हाई ध्यानमा लेवानं की, ह्याना अर्थ काय शे! ✡ **24:17** २४:१७ लूक १७:३१ ✡ **24:21** २४:२१ प्रकटीकरण ७:१४ ✡ **24:26** २४:२६ लूक १७:२३,२४ ✡ **24:28** २४:२८ लूक १७:३७ ✡ **24:29** २४:२९ प्रकटीकरण ६:१२; प्रकटीकरण ६:१३ ✡ **24:30** २४:३० प्रकटीकरण १:७ ✡ **24:43** २४:४३ लूक १२:३९,४० ✡ **25:1** २५:१ लूक १२:३५

1 ✡तवय "स्वर्गनं राज्य" त्या दहा कुवारीसनामायक राही, ज्या
दिवा लिसन नवरदेवले भेटाले निंघनात. 2 त्यामा पाच हुशार अनी
पाच मूर्ख व्हत्यात. 3 मुर्ख कुवारीसनी दिवा लिधात पण संगे तेल लिधं
नही, 4 हुशार कुवारीसनी दिवा लिधात अनी संगे भांडामा तेल पण लिधं.
5 मंग नवरदेवले येवाले उशीर व्हवामुये सर्वासले डुलक्या वन्यात अनं
झोप लागनी.
6 तवय मध्य रातले आवाज वना की, "दखा नवरदेव वना! चला
त्याले भेटाले जाऊ!" 7 मंग दहा कुवाऱ्या ऊठन्यात अनी आपला दिवा
निट कराले लागण्यात. 8 तवय मुर्खसनी हुशारसले सांगं, "आमले बी
तुमना तेलमातीन थोडं द्या, कारण आमना दिवा विझी राहिनात." 9 पण
हुशार कुवारीसनी उत्तर दिधं, "हाई आमले बी पुराव नही अनी तुमले
बी पुराव नही. म्हणीन तुम्हीन दुकानमा जाईसन तुमनाकरता ईकत लई
या." 10 मंग त्या तेल ईकत लेवाले गयात इतलामा नवरदेव वना; अनी
ज्या पाच तयार व्हत्यात त्या त्यानासंगे लगीनना जेवणकरता मझार
निंघी गयात अनी दरवाजा बंद व्हई गया.
11 ✡"नंतर त्या बाकीन्या कुवाऱ्या ईसन सांगाले लागण्यात.
'गुरजी, गुरजी!' आमनाकरता दार उघडा." 12 नवरदेवनी उत्तर दिधं,
मीं तुमले सत्य सांगस मी तुमले वळखस नही, 13 यामुये, "तुम्हीन जागा
ऱ्हा, कारण तुमले माहित नही तो दिन अनं ति येळ कवय ई."

### रूपयासना दृष्टांत
*(लूक १९:११-२७)*

14 ✡"ज्याप्रमाणे प्रवासले जाणारा एक माणुस स्वतःनी संपत्तीनी
जबाबदारी आपला सेवकसले बलाईन त्यासले सोपी देस," त्याप्रमाणे
हाई शे. 15 एकले त्यानी पाच हजार रूपया, एकले दोन हजार अनं
एकले एक हजार अस ज्याना त्याना योग्यतानुसार दिधात; अनी तो
प्रवासले निंघी गया. 16 ज्याले पाच हजार मिळेल व्हतात त्यानी लगेच
जाईन त्याना धंदामा टाकीन अजुन पाच हजार कमाडात. 17 याचप्रमाणे
ज्याले दोन हजार भेटेल व्हतात, त्यानी बी दोन हजार कमाडात. 18 पण
ज्याले एक हजार रूपया भेटेल व्हतात, त्यानी जमीन खंदि अनी आपला
मालकना पैसा तठे दपाडी दिधात.
19 "मंग बराच दिन नंतर सेवकसना मालक परत वना अनी त्यासना
हिशोब लेवाले लागना. 20 तवय ज्याले पाच हजार भेटेल व्हतात तो
आखो पाच हजार लईन बोलना, मालक, तुम्हीन माले पाच हजार देयल
व्हतात, दखा! त्यानावर मी आखो पाच हजार कमाडात. 21 त्याना
मालक त्याले बोलना, शाब्बास ईश्वासु सेवक! तुले थोडं दिधं त्यानामा
तु ईश्वासु राहिना. मी तुले बऱ्याच गोष्टीसनी जबाबदारी दिसु, आपला
मालकनी खूशीमा सामील हो! 22 मंग ज्याले दोन हजार भेटेल व्हतात
तो बी ईसन बोलना, मालक, तुम्हीन माले दोन हजार देयल व्हतात,
दखा! त्यानावर मी आखो दोन हजार कमाडात." 23 त्याना मालक
त्याले बोलना, शाब्बास, ईश्वासु सेवक! तुले थोडं दिधं त्यानामा तु
ईश्वासु राहिना. मी तुले बऱ्याच गोष्टीसनी जबाबदारी दिसु, आपला
मालकनी खूशीमा सामील हो! 24 मंग ज्याले एक हजार भेटेल व्हतात
तो बी ईसन बोलना, मालक, माले माहित व्हतं तुम्हीन कठोर शेतस;
जठे तुम्हीन पेरेल नही तठे कापणी करतस; अनी जठे पसारेल नही तठेन
गोळा करतस. 25 म्हणीन मी भ्याईसन तुमना हजार रूपया जमीनमा
दपाडी ठेयेल व्हतात; दखा! त्या तुमना तुमले भेटी गयात. 26 त्याना
मालक त्याले बोलना, अरे दुष्ट अनं आळशी सेवक, जठे मी पेरेल नही
तठे कापणी करस अनं जठे पसारेल नही तठेन गोळा करस, हाई जर
तुले माहित व्हतं? 27 तर मंग, तु मना पैसा सावकारकडे ठेई देता म्हणजे
मी ईसन मना पैसा त्यासनाकडतीन व्याजसहित परत लेतु. 28 यामुये
याना कडतीन त्या हजार रूपया ल्या, अनी ज्यानाजोडे दहा हजार शेतस
त्याले द्या. 29 ✡कारण ज्यानाजोडे शे त्याले देवामा ई अनी त्यानाजोडे
भरपुर व्हई जाई; अनी ज्यानाकडे नही शे त्यानाजवळ जे बी व्हई, ते
पण काढी लेतीन. 30 ✡ह्या बिनकामना सेवकले अंधारमा टाका, तठे
रडणं अनं दातखाणं चाली.

### न्यायना दिन

31 ✡जवय मनुष्यना पोऱ्या आपला वैभवमा सर्वा देवदूतसंगे ई,
तवय मी आपला वैभवी राजासनवर बठसु. 32 मनापुढे सर्वा राष्ट्रे गोळा
व्हतीन अनी जशा मेंढपाय बकरीसमातीन मेंढरसले येगळे करस तस तो
त्यासले एकमेकसपाईन येगळे करी. 33 तो मेंढरासले आपला उजवी
बाजुले अनी बकरीसले डावीबाजुले करी. 34 तवय राजा आपला
उजवीबाजुनासले सांगी, हे मना बापनी! आशिर्वादित करेल लोकसवन
या, जे राज्य सृष्टीना उत्पत्तिपाईन तुमनाकरता तयार करी ठेयल शे त्याना
अधिकारी बना. 35 कारण माले भूक लागेल व्हती तवय तुम्हीन माले
खावाले दिधं, तिश लागेल व्हती तवय पाणी पेवाले दिधं; अनोळखी
व्हतु तवय माले घरमा लिधं, 36 उघडा व्हतु तवय माले कपडा दिधात;
आजारी व्हतु तवय माले दखाले वनात, बंदिगृहमा व्हतु तवय माले
भेटाले वनात. 37 त्या येळले धार्मीक लोक त्याले उत्तर देतीन की,
प्रभुजी, आम्हीन तुमले कवय भूक लागेल दखीन खावाले दिधं? कवय
तिश लागेल दखीन पाणी पेवाले दिधं? 38 तुमले कवय अनोळखी
समजीसन घरमा लिधं? उघडा दखीसन कवय तुमले कपडा दिधात?
39 अनी तुम्हीन आजारी शेतस किंवा बंदिगृहमा शेतस हाई दखीन कवय
आम्हीन तुमले दखाले वनु? 40 तवय राजा त्यासले उत्तर दि, मी तुमले
सत्य सांगस की, जवय तुम्हीन मनामांगे येणारासपैकी एकसाठे बी हाई
करतस म्हणजे ते मनासाठेच करेल शे!

41 मंग डावीकडलासले तो सांगी, "अरे शाप लागेलसवन, सैतान
अनी त्याना दूतसकरता जो सार्वकालिक अग्नी तयार करी ठेयल शे
त्यामा मनासमोरतीन निंघी जा! 42 कारण जवय माले भूक लागेल व्हती
तवय तुम्हीन माले खावाले दिधं नही, तिश लागेल व्हती तवय तुम्हीन
माले पेवाले पाणी दिधं नही; 43 अनोळखी व्हतु तवय माले घरमा लिधं
नही, उघडा व्हतु तवय माले कपडा दिधात नही; मी आजारी अनं
बंदिगृहमा व्हतु तवय तुम्हीन माले भेटाले वनात नही. 44 त्या येळले
ह्या पण त्याले उत्तर देतीन, प्रभुजी, आम्हीन कवय तुमले भूका, तिशा,
अनओळखी, उघडं, आजारी अनी बंदिगृहमा दखीन कवय तुम्हीन सेवा
करी नही? 45 तवय तो त्यासले उत्तर दि, 'मी तुमले सत्य सांगस की,
तुम्हीन ज्याप्रमाणे ह्या सर्वात धाकलासमातीन एकले बी करात नहीत
म्हणजेच माले करात नही.' 46 त्या तर, सार्वकालिक शिक्षा भोगाले
जातीन अनी न्यायी लोक सार्वकालिक जिवनमा जातीन."

---

✡ **25:11** २५:११ लूक १३:२५ ✡ **25:14** २५:१४ लूक १९:११-२७ ✡ **25:29** २५:२९ मत्तय १३:१२; मार्क ४:२५; लूक ८:१८ ✡ **25:30** २५:३० मत्तय ८:१२; २२:१३; लूक १३:२८ ✡ **25:31** २५:३१ मत्तय १६:२७; मत्तय १९:२८

# 26

### येशुले माराना कट

*(मार्क १४:१,२; लूक २२:१,२; योहान ११:४५-५३)*

1 मंग येशुनी ह्या सर्वा गोष्टी शिकाडानं संपाडानंतर आपला शिष्यसले
सांगं, 2 तुमले माहित शे की, दोन दिन नंतर वल्हांडण सण शे अनी
मनुष्यना पोऱ्याले क्रुसखांबवर खियाकरता धरी देतीन.

3 तवय कैफा नावना प्रमुख याजकना वाडामा मुख्य याजक अनं
वडील लोके गोया व्हयनात, 4 अनी येशुले गुपचुप धरीन मारी टाकानी
योजना त्यासनी बनाडी. 5 "लोकसमा दंगल व्हवाले नको म्हणीन हाई
सणना दिनमा नही करानं, अस त्यासनी सांगं."

### येशुना तेल अभिषेक

*(मार्क १४:३-९; योहान १२:१-८)*

6 जवय येशु बेथानी गावले जो पहिले कोडरोगी व्हता त्या शिमोनना
घर व्हता. 7 ✡मंग तो जेवाले बठेल व्हता तवय एक बाई महागडं सुगंधी
तेल संगमरवरना भांडामा लई वनी अनी तिनी ते भांडं फोडीन तेल त्याना
डोकावर वती दिधं. 8 हाई दखीन त्याना शिष्य संतापिन बोलनात, हाई
का बर नासाडं? 9 हाई "ईकीन बराच पैसा भेटतात अनी त्या गरीबसले
देता येतात!"

10 येशुने हाई दखीन त्यासले सांगं, हाई बाईले का बर त्रास देतस?
तिनी तर मनाकरता चांगल कार्य करेल शे. 11 गरीब कायमना तुमना
जोडे शेतस, पण मी कायमना तुमना जोडे शे अस नही. 12 तिनी मना
शरिरवर सुगंधी तेल वतीन मना उत्तरकार्यनी तयारी पहिलेच करी दिधी.
13 मी तुमले सत्य सांगस की, सर्व जगमा जठे जठे सुवार्ता सांगतीन,
तठे तठे तिनी जे सत्कर्म करेल शे त्यानी आठवण करतीन.

### यहुदा ईश्वासघात करस

*(मार्क १४:१०-११; लूक २२:३-६)*

14 मंग बारा शिष्यसमधला एक यहूदा इस्कर्योत मुख्य याजकसकडे
गया. 15 अनी त्यानी सांगं, मी येशुले धरीन तुमले सोपी दिसु तर माले
काय दिशात? मंग त्यासनी त्याले तिस रूपया दिधात. 16 तवयपाईन
यहूदा त्याले कसं धरी देवाणी यानी संधी दखु लागना.

### शेवटलं जेवण

*(मार्क १४:१२-२१; लूक २२:७-१३,२१-२३; योहान १३:२१-३०)*

17 नंतर बेखमीर भाकरीना सणना पहिला दिन शिष्य येशुकडे ईसन
बोलणात, आपलाकरता वल्हांडण सणना जेवणनी तयारी आम्हीन कोठे
करानी अशी तुमनी ईच्छा शे?

18 त्यानी सांगं, नगरमा एक माणुसकडे जाईन त्याले सांगा की, गुरू
म्हणस, मनी येळ जोडे येल शे; माले मना शिष्यसनासंगे तुना आठे
वल्हांडण सण कराना शे.

19 मंग येशुनी सांगेल प्रमाणे शिष्यसनी जाईन वल्हांडणना जेवणनी
तयारी करी.

20 संध्याकाय व्हयनी तवय तो बारा शिष्यससंगे जेवणले बठना.
21 जवय त्या जेवण करी राहींतात तवय येशुनी सांगं, मी तुमले सत्य
सांगस, तुमनामधला एकजण माले धरी दि.

22 तवय त्या भलताच नाराज व्हयनात अनी त्या एक एक करीसन
त्याले ईचारू लागनात, "प्रभुजी, मी शे, का तो?"

23 येशुनी उत्तर दिधं, ज्यानी मनासंगे ताटमा हात टाकेल शे, तोच
माले धरी दि. 24 मनुष्यना पोऱ्याबद्दल जस लिखेल शे तसा तो जाई
खरा, पण जो मनुष्यना पोऱ्याले धरी दि, त्या माणुसना धिक्कार असो,
तो माणुस जन्मले नही येता तर ते त्याले चांगलं व्हतं!

25 तवय त्याले धरी देणारा यहुदानी त्याले ईचारं, "गुरजी" मी शे
का तो? येशुनी त्याले उत्तर दिधं, तु म्हणस तसच.

### प्रभुभोजन

*(मार्क १४:२२-२६; लूक २२:१४-२०; १ करिंथ ११:२३-२५)*

26 मंग त्या जेवण करी राहींतात तवय येशुनी भाकर लिधी अनं
उपकार मानीन तोडी अनी शिष्यसले दिसन सांगं, "हाई ल्या अनी
खा, हाई मनं शरीर शे,"

27 अनी त्यानी प्याला लिधा अनी उपकार मानीन त्यासले दिसन
सांगं, "तुम्हीन सर्वा यानामातीन प्या," 28 हाई मना "करारनं रक्त, शे.
पापसनी क्षमा व्हवाकरता सर्वासना करता वताई जाई राहिना शे. 29 मी
तुमले सत्य सांगस की, मी तोपावत द्राक्षवेलना रस पेवाव नही जोपावत
मना पित्याना राज्यमा नवा द्राक्षरस पितस नही."

30 मंग देवनं गानं म्हणीसन त्या जैतुनना डोंगरकडे निंघी गया.

### पेत्रकरता भविष्यवाणी

*(मार्क १४:२७-३१; लूक २२:३१-३४; योहान १३:३६-३८)*

31 मंग येशु त्यासले बोलना, "तुम्हीन रातले सर्वा माले सोडीन
पळी जाशात, कारण शास्त्र अस सांगस की, 'देव मेंढपायले मारी टाकी
अनी कळपमाधला मेंढरसनी दाणादाण व्हई जाई.' 32 ✡पण मी जिवत
व्हवानंतर तुमना पहिले गालीलमा जासु."

33 पेत्र येशुले बोलना, "सर्वा तुले सोडीन पळतीन पण मी तुले
सोडीन पळाव नही!"

34 येशु बोलना, "मी तुले सत्य सांगस की, आज रातले कोंबडा
कोकावाना पहिले तु माले तिनदाव नाकारशी."

35 पेत्र त्याले बोलना, "तुनासंगे माले मरणं पडनं तरी मी तुमले
नाकारावुच नही!" अनी बाकीना शिष्यसनी पण तसच सांगं.

### गेथशेमाने बागमा येशुनी प्रार्थना

*(मार्क १४:३२-४२; लूक २२:३९-४६)*

36 नंतर येशु त्याना शिष्यससंगे गेथशेमाने नावना बगीच्यामा वना,
"मी पुढे जाईन प्रार्थना करस तोपावत तुम्हीन आठे बठा." 37 मंग
त्यानी पेत्र अनं जब्दीना दोन्ही पोऱ्या यासले संगे लिधं अनं तो खुपच
खिन्न अनं कष्टी व्हवाले लागना. 38 तवय तो त्यासले बोलना, "मना
जीव" मरणप्राय, खुपच खिन्न व्हई जायेल शे, तुम्हीन आठेच थांबा
अनी मनासंगे जागा ऱ्हा.

39 मंग तो थोडा पुढे जावानंतर पालथा पडिन अशी प्रार्थना कराले
लागना की, "हे मना पिता व्हई तर हाऊ दुःखनां प्याला मनावरतीन
टळी जावो! तरी मना ईच्छाप्रमाणे नको तर तुनी ईच्छाप्रमाणे व्हऊ
दे."

40 मंग तो शिष्यसना जोडे वना अनी त्या झोपेल शेतस हाई दखीन
पेत्रले बोलना, काय! एक तास बी तुमनाघाई जागं ऱ्हावायनं नही का?
41 तुम्हीन परिक्षामा पडाले नको म्हणीन जागा ऱ्हा अनी प्रार्थना करा;
आत्मा तयार शे खरं पण शरीर अशक्त शे.

---

✡ **26:7** २६:७ लूक ७:३७,३८ ✡ **26:32** २६:३२ मत्तय २८:१६

42 परत दुसरी दाव जाईसन येशुनी हाई प्रार्थना करी की, “हे मना
पिता, जर हाऊ प्याला मी पेवाशिवाय टळाव नही तर तुनी ईच्छाप्रमाणे
व्हऊ दे.” 43 मंग त्यानी परत ईसन त्यासले झोपेल दखं; कारण
झोपमुये त्यासना डोया जड व्हयेल व्हतात. 44 परत तो त्यासले सोडीन
गया अनी परत त्यानी तिसरांदाव त्याच शब्दसमा प्रार्थना करी. 45 परत
तो शिष्यसकडे ईसन बोलना, काय तुम्हीन अजुन आरामशीर झोपी
राहिनात? दखा! येळ जवळ येल शे, मनुष्यना पोऱ्या पापी लोकसना
हातमा देवाई जाई राहिना. 46 ऊठा, चला. दखा, माले धरी देणारा
जोडे येल शे.

### येशुले अटक करतस

*(मार्क १४:४३-५०; लूक २२:४७-५३; योहान १८:३-१२)*

47 येशु बोली राहींता इतलामा बारा शिष्यसपैकी एक म्हणजे यहूदा
तठे वना, त्यानाबरोबर मुख्य याजक, शास्त्री अनी वडील लोकसना
माणसे तलवारी अनी टिपरा लई वनात. 48 त्याले धरी देणारानी एक
इशारा देयल व्हता तो असा की; “मी ज्यानं चुंबन लिसु तोच तो शे.
त्याले धरा!” 49 मंग त्यानी लगेच येशुजोडे ईसन, गुरजी, नमस्कार
बोलीन त्याना चुंबन लिधात.
50 येशु त्याले बोलना, “दोस्त! ज्या कामकरता तु येल शे ते
कर” तवय त्यासनी जोडे ईसन येशुले धरं अनी अटक करी. 51 मंग
दखा, येशुनासंगे ज्या व्हतात त्यासनामातीन एकनी तलवार काढी अनी
महायाजकना दासवर चालाडी अनं त्याना कान कापी टाका. 52 तवय
येशु त्याले बोलना “तुनी तलवार परत जागावर ठेव,” कारण “तलवार
चालाडणारा सर्वजण तलवारघाईच नाश पावतीन.” 53 तुले अस वाटस
का की, माले मना पिताजोडे मांगता येस नही, आत्तेना आत्तेच तो
मनाकरता देवदूतसना बारा सैन्यपेक्षा जास्त धाडु नही शकस? 54 मंग
शास्त्रना शास्त्रलेख कशा पुर्ण व्हई की, हाई व्हणं आवश्यकच शे?
55 ✡✡तवय येशु लोकसनी गर्दीले बोलना, “जस एखादा नियम
तोडणाराले धराकरता तलवार अनी टिपरा लई जातस तसा तुम्हीन माले
धराले येल शेतस का? मी रोज मंदिरमा बशीन शिकाडी राहिंतु तरी
तुम्हीन माले धरं नही. 56 पण संदेष्टासना लेख पुर्ण व्हवाले पाहिजे
म्हणीन हाई व्हयनं.” इतलामा सर्व शिष्य त्याले सोडीन पळी गयात.

### मुख्य याजकससमोर येशुनी चौकशी

*(मार्क १४:५३-६५; लूक २२:५४,५५,६३-७१; योहान १८:१३,१४,१९-२४)*

57 मंग येशुले धरणारासनी त्याले कैफा नावना मुख्य याजक याना
घर लई गयात, तठे शास्त्री अनं वडील लोक जमेल व्हतात. 58 पेत्र
दुरतीन त्याना मांगेमांगे मुख्य याजकना वाडापावत गया अनं मझार
जाईन त्याना शेवट काय व्हस हाई दखासाठे पहारेकरीसमा बसना.
59 मुख्य याजक अनं सर्व न्यायसभा यासनी येशुले मारी टाकना
उद्देशतीन त्यानविरूध्द खोटा आरोप शोधी राहींतात; 60 अनी बराच
खोटा आरोप करनारा वनात पण त्यामा त्यासले काहीच भेटनं नही,
तरी शेवट दोनजण ईसन बोलणात की, 61 ✡“देवनं मंदिर तोडीन ते
तिन दिनमा बांधाले मी समर्थ शे अस हाऊ बोलना.”
62 तवय मुख्य याजक ऊठीसन येशुले बोलना, “तु काहीच उत्तर
देत नही का?” या तुनाविरूध्द कितला आरोप करी राहिनात, 63 पण
येशु गप्पच राहिना. यावरतीन मुख्य याजकनी त्याले सांगं, “मी तुले
जिवत देवनी शप्पथ घालिन विचारस की; जर तु देवना पोऱ्या ख्रिस्त
शे तर तसं आमले सांगं.”
64 येशु त्याले बोलना, “तु सांगस तसच आखो. मी तुमले सांगस;
यापुढे तुम्हीन फक्त मनुष्यना पोऱ्याले सर्व समर्थना उजवीकडे बठेल
अनं स्वर्गना ढगसवर येतांना दखशात!”
65 तवय मुख्य याजकनी आपला कपडा फाडिसन सांगं, हाऊ
देवनी निंदा करी राहिना, आते आमले आखो साक्षीदारसनी काय गरज!
तुम्हीन हाई निंदा ऐकेल शे! 66 तुमले काय वाटस? त्यासनी उत्तर दिधं,
“हाऊ मृत्यूदंडना योग्य शे.”
67 तवय त्या त्याना तोंडवर थुंकनात; अनं त्यासनी त्याले बुक्क्या
माऱ्यात अनी बाकिनासनी त्याले थापड्या मारीन सांगं 68 अरे ख्रिस्त!
“भविष्यवाणी करीसन सांगं तुले कोणी मारं!”

### पेत्र येशुले नकारस

*(मार्क १४:६६-७२; लूक २२:५६-६५; योहान १८:१५-१८,२५-२७)*

69 इकडे पेत्र वाडामा बाहेर बठेल व्हता; तवय मुख्य याजकनी एक
दासी त्यानाकडे ईसन बोलनी, “तु पण गालीलकर येशुसंगे व्हता.”
70 तो सर्वासना समोर नकारीन बोलना. “तु काय सांगी राहीनी,
माले माहीत नहीं” 71 मंग तो बाहेर वट्टावर गया तवय आखो एक दासी
त्याले दखीन तठे ज्या उभा व्हतात त्यासले बोलनी, “हाऊ पण नासरी
येशु बरोबर व्हता.”
72 परत “तो शपथ लिसन बोलना मी त्या माणुसले वळखत नही!”
73 नंतर थोडा येळतीन तठे उभा राहणारासनी जोडे ईसन पेत्रले सांगं,
खरच तु पण त्यानामाधलाच शे, कारण तुना बोलावरतीन तु कोण शे हाई
समजी राहिनं.
74 मंग पेत्र बोलणा, “जर मी खोटं बोली ऱ्हायनु तर, देव माले मारी
टाको! अशा शपथा वाहीन बोलु लागणा, हाऊ ज्या माणुसबद्दल तुम्हीन
बोली राहिनात त्याले मी वळखत नही!” इतलामा कोंबडा कोकायना,
75 तवय “कोंबडा कोकावाना पहीले तु माले तीनदाव नाकारशी” असा
ज्या शब्द येशुनी पेत्रले सांगेल व्हतात त्या त्याले आठवणात अनी तो
बाहेर जाईसन हंबरडा फोडीन रडाले लागना.

## 27

### येशुले पिलातकडे लई जातस

*(मार्क १५:१; लूक २३:१,२; योहान १८:२८-३२)*

1 सकायमा सर्व मुख्य याजक अनं वडील लोकसनी येशुले मारी
टाकाकरता त्यानाविरूध्द योजना करी. 2 अनी त्यासनी त्याले धरीन
पिलात सुभेदारले सोपी दिधं.

### यहूदाना मृत्यू

*(प्रेषित १:१८,१९)*

3 ✡येशुले शिक्षापात्र ठरायं हाई दखीन, त्याले धरी देणारा यहूदा
याले पस्तावा वना अनी तो त्या तिस रूपया मुख्य याजक अनी वडील
लोकं यासले दिसन बोलना, 4 “मी निर्दोष माणुसले पकडाई दिसन पाप
करेल शे!” त्या बोलणात, त्यानं आमले काय “तुनं तु दख!”
5 तवय तो त्या रूपया मंदिरमा फेकीन निंघी गया; अनी त्यानी जाईन
फाशी लिधी.

---

✡ **26:55** २६:५५ लूक १९:४७; २१:३७ ✡ **26:55** २६:५५ लूक १९:४७ ✡ **26:61** २६:६१ योहान २:१९ ✡ **27:3** २७:३ प्रेषित १:१८,१९

6 मुख्य याजकसनी त्या पैसा लिसिन सांगं, “हाई दानपेटिमा टाकाना
योग्य नही शेतस कारण हाई रंगतन मोल शे.” 7 मंग त्यासनी ईचार
करीसन त्या रूपयासतीन, परदेशीसले पुराकरता कुंभारनं शेत लिधं.
8 यामुये आज बी त्या शेतले “रक्तनं शेत” अस म्हणतस.
9 तवय जे वचन यिर्मया संदेष्टाद्वारे सांगेल व्हतं ते पुर्ण व्हयनं; ते अस
की, “ज्यानं मोल इस्राएलना वंशसपैकी काही जणसनी ठरायेल व्हतं,
ते त्यानं मोल म्हणजे त्या तिस रूपया त्यासनी लिधात, 10 अनी प्रभुनी
माले आज्ञा करेलप्रमाणे कुंभारनं शेत ईकत लेवासाठे त्यासनी दिधात.”

### पिलात समोर येशु

*(मार्क १५:२-५; लूक २३:३-५; योहान १८:३३-३८)*

11 मंग येशु सुभेदार पुढे उभा व्हता तवय सुभेदारनी त्याले ईचारं, “तु
यहूद्यासना राजा शे का?” येशुनी उत्तर दिधं तु सांगस तसच. 12 मुख्य
याजक अनी शास्त्री त्यानावर आरोप करी राहींतात तवय त्यानी काहीच
उत्तर दिधं नही.
13 तवय पिलात बोलना, “ह्या लोक तुनाविरूध्द कितल्या गोष्टीसनी
साक्ष दि राहिनात, हाई तु ऐकी नहीं राहिना का?”
14 पण येशु काहीच बोलना नही, एक शब्द पण नही यावरतीन
सुभेदारले आश्चर्य वाटणं.

### मृत्यूदंडनी आज्ञा

*(मार्क १६:६-१५; लूक २३:१३-२५; योहान १८:३९—१९:१६)*

15 वल्हांडण सणमा लोके ज्याले सांगेत त्या कैदीले सोडानी
सुभेदारनी सवय व्हती. 16 तवय तठे बरब्बा नावना कुप्रसिध्द कैदी
व्हता. 17 जवय लोके जमनात तवय पिलातनी त्यासले ईचारं, “मी
तुमनाकरता कोणले सोडु अशी तुमनी ईच्छा शे? बरब्बाले की, ज्याले
ख्रिस्त म्हणतस त्या येशुले?” 18 कारण त्यासले त्याना हेवा वाटी
राहींता म्हणीन त्याले धरी देयल व्हतं, हाई पिलातले समजनं व्हतं.
19 मंग तो न्यायासनवर बठेल व्हता तवय त्याना बायकोनी त्याले
निरोप धाडा की; “त्या न्यायी माणुसना काममा तुम्हीन पडु नका, कारण
रातले स्वप्नमा भलता दुःख भोगात.”
20 पण मुख्य याजक अनं वडील लोकसनी लोकसले चिंगाडीन
हाई मागणी कराले लाई की, बरब्बाले सोडा अनं येशुले मारी
टाका. 21 सुभेदारनी त्यासले ईचारं की, “या दोन्हीसमातीन कोणले
तुमनाकरता सोडु अशी तुमनी ईच्छा शे?” त्या बोलणात, “बरब्बाले!”
22 “पिलातनी त्यासले ईचारं, मंग ज्याले ख्रिस्त म्हणतस, त्या येशुनं
मी काय करू?” सर्वा बोलणात, “त्याले क्रुसखांबवर खिया!”
23 पिलात बोलणा, “का बर? त्यानी काय वाईट करेल शे?”
तवय त्या आखो वरडीन बोलणात; “त्याले क्रुसखांबवर खिया!”
24 जवय पिलातनी दखं आपल काहीच नही चाली राहिनं, उलट
जास्तच गडबड व्हई राहिनी तवय त्यानी पाणी लिधं अनं लोकससमोर
हात धोईसन सांगं, “मी ह्या न्यायी माणुसना रक्तबद्दल निर्दोष शे, तुमनं
तुम्हीन दखी ल्या!”
25 यानावर लोकसनी उत्तर दिधं “यानं रक्त आमनावर अनी आमना
पोर्‍यासवर राहो!” 26 तवय पिलातनी त्यासनाकरता बरब्बाले सोडं;
अनं येशुले फटका मारीन क्रुसखांबवर खियाकरता सोपी दिधं.

### शिपाई येशुनी थट्टा करतस

*(मार्क १५:१६-२०; योहान १९:२,३)*

27 नंतर सुभेदारना सैनिक येशुले वाडामा लई गयात अनी त्याना
चारीबाजुले सैन्य गोळा करी लिधं. 28 मंग त्याना कपडा काढिन त्याले
गडद लाल रंगना झगा घाली दिधा. 29 अनी त्यासनी काटेरी झुडूपना
मुकूट गुंफीण त्याना डोकावर ठेवा, त्याना उजवा हातमा वेत दिधा अनी
त्यानापुढे गुढघा टेकीन, “हे यहूद्यासना राजा तुना जयजयकार होवो!”
अस बोलीन त्यानी थट्टा करी. 30 त्या त्यानावर थुंकनात अनं वेत
लिसन त्याना डोकावर माराले लागनात. 31 मंग त्यासनी थट्टा करानंतर
त्यासनी त्याना आंगमातीन तो झगा काढीन त्याना कपडा त्याले घाली
दिधात अनी त्याले क्रुसखांबवर खियाकरता लई गयात.

### येशुले क्रुसखांबवर खियतस

*(मार्क १५:२१-३२; लूक २३:२६-४३; योहान १९:१७-२७)*

32 त्या बाहेर जाई राहींतात तवय शिमोन नावना एक कुरेनेकर
माणुस त्यासले दखायना, त्यासनी त्याले येशुना क्रुसखांब उचलीन
लई जावाकरता जबरदस्ती करी. 33 मंग गुलगुथा नावनी जागा,
म्हणजे, “कवटीनी जागा” आठे ईसन पोहचावर 34 त्यासनी त्याले
कडु मसाला मिसाळेल द्राक्षरस पेवाले दिधा; पण तो चाखीन दखावर,
त्यानी तो पिधा नही. 35 त्याले क्रुसखांबवर खियावर त्यासनी चिठ्ठ्या
टाकीन त्याना कपडा वाटी लिधात. 36 नंतर त्यासनी तठे बशीन
त्यानी राखन करी. 37 त्यासनी त्याना दोषपत्रना लेख त्याना डोकावर
क्रुसखांबवर लाया, तो असा की, हाऊ यहूदीसना राजा येशु शे. 38 नंतर
त्यासनी येशुनासंगे दोन लुटारूसले, एकले उजवीकडे अनी एकले
डावीकडे असा क्रुसखांबवर खियात. 39 अनी जवळतीन जाणारासनी
डोकं हालाईन त्यानी अशी निंदा करी की, 40 ✡“अरे मंदिर तोडीन
तिन दिनमा बांधणारा! स्वतःले वाचाड तु देवना पोर्‍या व्हई तर
क्रुसखांबवरतीन खाल ये!”
41 तसच मुख्य याजक, शास्त्री अनं वडील लोके या पण थट्टा
करीसन बोलणात की; 42 “त्यानी दुसरासनं तारण करं; त्याले
स्वतःले वाचाडता येत नही! तो इस्राएलसना राजा शे; त्यानी आते
क्रुसखांबवरतीन खाल यावं, म्हणजे आम्हीन त्याना ईश्वास करू! 43 तो
देववर ईश्वास ठेवस तो देवना पोर्‍या शे; त्याले तो प्रिय व्हई तर त्यानी
त्याले आते सोडवाव!”
44 ज्या चोर त्यानासंगे क्रुसखांबवर व्हतात त्यासनी पण त्यानी
तशीच थट्टा करी.

### येशुना मृत्यू

*(मार्क १५:३३-४१; लूक २३:४४-४९; योहान १९:२८-३०)*

45 दुपारना बारा वाजापाईन ते तीन वाजापावत सर्वा देशवर अंधार
पडेल व्हता. 46 दुपारना तीन वाजनात तवय येशु जोरमा आरोळी मारीन
बोलना, “एलोई, एलोई, लमा सबकतनी?” म्हणजे “मना देव, मना
देव, तु मना त्याग का बरं करा?”
47 तवय ज्या तठे उभा व्हतात त्यासनामातीन बराच जण हाई
ऐकीन बोलणात, “दखा, तो एलियाले बलाई राहिना!” 48 तवय
एकजणनी लगेच पयत जाईसन तुरट पदार्थमा स्पंज बुडाईन तो वेत
नावना वनस्पतीना काठीवर ठिसन त्याले पेवाले दिधा.
49 पण बाकिना बोलणात, “राहु द्या, एलिया त्याले वाचाडाले येस
का नही हाई दखुत!”
50 मंग परत येशुनी मोठी आरोळी मारीन प्राण सोडा.

✡ **27:40** २७:४० मत्तय २६:६१; योहान २:१९

51 तवय मंदिरमधला पडदा वरपाईन खालपावत फाटीन दोन तुकडा
व्हयनात, जमीन कांपनी, खडक फुटनात, 52 तवय कबरी उघडनात
अनी झोपेल बराच पवित्र लोकसना मृतदेह जिवत व्हयनात. 53 त्या
त्यासना पुनरूत्थाननंतर कबरसमातीन निंघीसन पवित्र नगर यरूशलेमा
गयात अनी बराच लोकसले दिसनात.
54 जमादार अनं त्यानाबरोबर येशुवर लक्ष ठेवनारा भूकंप अनं घडेल
गोष्टी दखीन भलता घाबरनात अनं बोलणात "खरंच हाऊ देवना पोऱ्या
व्हता!"
55 ✡तठे बऱ्याच बाया, हाई दुरतीन दखी राहिंत्यात, त्या
गालीलतीन येशुनी सेवा करत त्याना मांगे येल व्हत्यात. 56 त्यामा
मग्दालीया मरीया, याकोब अनं योसे यासनी आई मरीया अनं जब्दीनी
बायको ह्या व्हत्यात.

### येशुले कबरमा ठेवतस

*(मार्क १५:४२-४७; लूक २३:५०-५६; योहान १९:३८-४२)*

57 मंग संध्याकाय व्हवावर अरिमथाई गावना योसेफ नावना एक
श्रीमंत माणुस वना, हाऊ पण येशुना शिष्य व्हता. 58 त्यानी पिलातजोडे
जाईसन येशुनं शरीर मांगं तवय पिलातनी ते देवानी आज्ञा दिधी.
59 योसेफनी ते शरीर लिसन तागना स्वच्छ कापडमा गुंढाळं. 60 त्यानी
ते खडकमा बनाडेल आपली नविन कबरमा ठेवं अनी कबरना तोंडवर
भली मोठी धोंड लाई दिधी अनं तो निंघी गया. 61 तठे कबरसमोर
मग्दालीया मरीया अनं दुसरी मरीया ह्या बठेल व्हत्यात.

### कबरवर पहारा

62 दुसरा दिन म्हणजे शब्बाथ दिननंतरना दिनले मुख्य याजक अनं
परूशी पिलातकडे गोळा व्हईन बोलनात, 63 ✡"महाराज, आमले
आठवण शे तो फसाडणारा जिवत व्हता तवय बोलणा व्हता, 'मी तीन
दिन नंतर मी परत जिवत व्हसु." 64 म्हणीन तिन दिनपावत कबरवर
पहारा ठेवानी आज्ञा द्या, कदाचित त्याना शिष्य रातले ईसन त्याले चोरी
ली जातीन अनं तो मेरेल मातीन ऊठेल शे, अस लोकसले सांगतीन;
शेवटली लबाडी पहिल्या पेक्षा वाईट व्हई. 65 पिलातनी त्यासले सांगं;
"तुमना जोडे पहारेकरी शेतस जा तुमले जशा पहारा ठेवता ई तस करा."
66 मंग त्या गयात अनं धोंडवर शिक्का मारीन कबरवर पहाराकरी
ठेवात अनं कबर सुरक्षित करी.

## 28

### येशुनं पुनरूत्थान

*(मार्क १६:१-१०; लूक २४:१-१२; योहान २०:१-१०)*

1 *शब्बाथना शेवट रविवारना दिन उजाडताच मग्दालीया मरीया
अनं दुसरी मरीया ह्या कबर दखाले वनात. 2 तवय दखा, मोठा भूकंप
व्हयना; कारण प्रभुना दूतनी स्वर्गमातीन उतरीसन धोंड एकबाजुले
लोटी अनं तिनावर तो बठना. 3 त्यानं रूप विजनामायक व्हतं अनं
त्याना कपडा बर्फनामायक व्हतात. 4 पहारेकरी त्याले घाबरी थरथर
कापाले लागनात अनं मेरेलना मायक व्हई गयात.
5 देवदूत त्यासले बोलणा, "तुम्हीन घाबरू नका," क्रुसखांबवर
खियेल येशुले तुम्हीन शोधी राहिनात, हाई माले माहित शे. 6 तो आठे
नही शे, कारण त्यानी सांगेल प्रमाणे तो जिवत व्हयेल शे, या, प्रभु झोपेल
व्हता ती हाई जागा दखा.
7 अनी लवकर जाईसन त्याना शिष्यसले सांगा की तो मेरेल मातीन
उठेल शे, दखा तुमना पहिले गालीलमा जाई राहिना, तठे तुम्हीन त्याले
दखशात, दखा, मी तुमले हाई सांगेल शे.
8 तवय त्या बाया घाबरीन अनं भलताच खूश व्हईसन लगेच
कबरपाईन निंघीन त्याना शिष्यसले हाई गोष्ट सांगाले पळण्यात.
9 मंग दखा येशु त्यासले भेटीन बोलणा, "शांती असो," त्यासनी
जोडे जाईसन त्याना पाय धरीन त्याले नमन करं. 10 तवय येशु त्यासले
बोलणा, "घाबरू नका, जा अनी हाई मना भाऊसले सांगा, यानाकरता
की त्यासनी गालीलमा जावाले पाहिजे, तठे त्या माले दखतीन."

### पहारेकरीसना निरोप

11 जवय त्या जाई राहिंत्यात, तवय दखा, पहारेकरीसमातीन बराच
जणसनी नगरमा जाईन घडेल सर्व गोष्ट मुख्य याजकसले सांगी.
12 तवय त्यासनी अनं वडील लोकसनी मिळीन योजना बनाडी अनी
पहारेकरीसले बराच चांदीनां शिक्का दिधात 13 अनी सांगं की,
"आम्हीन झोपेल व्हतुत तवय त्याना शिष्यसनी रातले ईसन त्याले चोरी
लई गयात, अस सांगा 14 अनी सुबेदारना कानवर हाई गोष्ट गई तर
आम्हीन त्याले समजाडीन तुमले चितामुक्त करसुत."
15 मंग त्यासनी चांदीना शिक्का लिसन त्यासले जश सांगेल व्हतं
तसच करं, अनी हाई गोष्ट यहूदी लोकसमा पसरनी, अनी आजपावत
तशीच चालु शे.

### येशु शिष्यसले दखायना

*(मार्क १६:१४-१८; लूक २४:३६-४९; योहान २०:१९-२३; प्रेषित १:६-८)*

16 ✡इकडे अकरा शिष्य गालीलमा जो डोंगर येशुनी सांगी ठेयल
व्हता त्यानावर गयात. 17 अनी त्यासनी त्याले दखीन नमन करं तरी
बराच जणसले शंका वाटनी. 18 तवय येशु जोडे ईसन त्यासले बोलणा,
"स्वर्गमा अनी पृथ्वीवर सर्वा अधिकार माले देयल शे. 19 ✡यामुये
तुम्हीन जाईसन सर्वा राष्ट्रमाधला लोकसले शिष्य करा; त्यासले पिता,
पुत्र अनं पवित्र आत्माना नावतीन बाप्तिस्मा द्या, 20 अनं ज्या आज्ञा
मी तुमले देयल शेतस त्या त्यासले पाळाले शिकाडा अनी दखा युगना
अंतपावत मी सदासर्वकाळ तुमनासंगे शे."

---

✡ **27:55** २७:५५ लूक ८:२,३ ✡ **27:63** २७:६३ मत्तय १६:२१; १७:२३; २०:१९; मार्क ८:३१; ९:३१; १०:३३,३४; लूक ९:२२; १८:३१-३३ * **28:1** २८:१ शब्बाथ दिन ✡ **28:16** २८:१६ मत्तय २६:३२; मार्क १४:२८ ✡ **28:19** २८:१९ प्रेषित १:८

# मार्कने लिहीलेले येशु ख्रिस्ताचे शुभवर्तमान
# मार्कनी लिखेल येशु ख्रिस्तनं शुभवर्तमान

## वळख

नवा करारमा येशुना जिवननं वर्णन ज्या चार पुस्तकसमा करेल शे. त्या पुस्तकसले शुभवर्तमान म्हणतस त्या पुस्तकसपैकी मार्कनी लिखेल येशु ख्रिस्तनं शुभवर्तमान हाई एक पुस्तक शे. येशु मरानंतर ह्या चारही शुभवर्तमान एकमांगे एक मत्तय, मार्क, लूक अनी योहान यासनी लिखात. या चारीसपैकी मार्कनी लिखेल येशु ख्रिस्तनं शुभवर्तमान हाई सर्वात धाकलं पुस्तक शे. काही तज्ञ लोकसनी मान्य करं की, मार्कनी लिखेल येशु ख्रिस्तनं शुभवर्तमान बाकीना तिन शुभवर्तमानसना पहिले येशुना जन्मना ६५-७० वर्षनंतर लिखायनं. अनं लिखानं कारण म्हणजे रोम शहरना ख्रिस्ती मंडळीसना आत्मईश्वास वाढाकरता अनं त्यासले प्रोत्साहन भेटाकरता लिखाई गयं.

हाऊ मार्क कोण शे? संत पौल अनं बर्णबा यासना हाऊ तरूण सोबती योहान मार्क म्हणजेच मार्कनी लिखेल येशु ख्रिस्तनं शुभवर्तमान ह्या पुस्तकना लेखक. मार्क पहिला मिशनरी प्रवासमा त्याना सोबतीसले मझारमाच सोडीन निंघी गया. त्यामुये त्याना आत्मसन्मानले ठेच पोहंचनी प्रेषित १३:१३ नंतर मात्र हाऊच मार्क बर्णबासंगे सेवा कार्यमा सहभागी व्हयेल दखास प्रेषित. १५:३७-३९ हाऊ मार्क पेत्रना जवळना मित्र व्हता १ पेत्र ५:१३ प्रमाणे. तज्ञसनी अस मान्य करेल शे की, जरी मार्कनी येशुनं जिवन अनं सेवा प्रत्यक्ष दखी नही तरी पेत्रना साक्षना आधारवर त्यानी त्यानं शुभवर्तमान लिखं. मार्कनी लिखेल येशु ख्रिस्तनं शुभवर्तमानना मुख्य दोन विषय म्हणजे ख्रिस्ती शिष्य कसं बनानं अनी शेवटला काळ विषयी येशुनी करेल भविष्य.

रूपरेषा

१. बाप्तिस्मा करनारा योहान अनं येशुना बाप्तिस्मा. १:१-१३
२. येशुनी गालील प्रदेशमा अनं परीसरमा करेल चमत्कार. १:१४–९:५०
३. गालील ते येरूशलेमपावत येशुना प्रवास अनं मंदीरमा प्रवेश. १०:१–१२:४४
४. येशुनी शेवटला काळबद्दल करेल भविष्य. १३:१-३७
५. येशुनं मरणं, पुनरूत्थान अनं महान आदेश. १४:१–१६:२०

### बाप्तिस्मा करनारा योहान अनी त्याना प्रचार

*(मत्तय ३:१-१२; लूक ३:१-१८; योहान १:१९-२८)*

1 देवना पोऱ्या येशु ख्रिस्तनी सुवार्तानी हाई सुरवात शे.
2 यशया संदेष्टानी लिखेल शे की,

"देव बोलना, 'मी मना दूतले तुना पहिले धाडसु तो तुनी वाट तयार करी.'

3 जंगलमा घोषणा करनारानी वाणी अशी व्हयनी की,

'प्रभुना मार्ग तयार करा;
त्यानी वाट नीट करा तसच हाई व्हयनं!' "

4 "पापसपाईन फिरा अनी बाप्तिस्मा *करी ल्या," असा प्रचार
करत बाप्तिस्मा करनारा योहान जंगलमा प्रकट व्हयना. 5 तवय
यरूशलेम शहर अनी यहूदीयाना प्रदेश मधला सर्व लोके त्यानाकडे
येवाले लागनात, त्याना प्रचार ऐकीन त्यासनी पाप कबुल करात अनी
योहान कडतीन यार्देन नदीमा बाप्तिस्मा करी लिधा.
6 योहान उंटसना केससपाईन बनाडेल कपडा घाले, कंबरले
कातडाना पट्टा बांधे अनी तो रानमध अनं टोळ खाये. 7 तो त्याना
प्रचारमा अस सांगे, "मना नंतर एकजण असा ई राहिना तो मनापेक्षा
इतला सामर्थ्यशाली राही की, वाकीसन त्याना पायमधला जोडानी दोरी
सोडानी पण मनी लायकी नही. 8 मी तर तुमले पाणीधाई बाप्तिस्मा देयल
शे; पण तो तुमले पवित्र आत्माधाई बाप्तिस्मा दि."

### येशुना बाप्तिस्मा अनं सैतानकडतीन त्यानी परिक्षा

*(मत्तय ३:१३-१७; ४:१-११; लूक ३:२१-२२; ४:१-१३)*

9 त्या दिनसमा येशुनी गालील प्रदेशमा नासरेथ गावतीन ईसन योहान
कडतीन यार्देन नदीमा बाप्तिस्मा करी लिधा. 10 येशु पाणीमाईन वर
येस नही येस तोच स्वर्ग उघडेल शे अनं पवित्र आत्मा कबुतरना मायक
त्यानावर उतरी राहीना अस त्यानी दखं; 11 ✡तवय लगेच स्वर्गमाईन
अशी वाणी व्हयनी की, "तु मना पोऱ्या, माले परमप्रिय शे, तुनावर मी
भलताच खूश शे."
12 मंग पवित्र आत्मा त्याले लगेच जंगलमा लई गया; 13 तो
जंगलमा चाळीस दिन राहीना, त्यानासंगे जंगलना जनावरस शिवाय
कोणी बी नव्हतं, तठे सैताननी येशुनी परिक्षा लिधी. त्यानंतर देवदूत
ईसन त्यानी सेवा कराले लागनात.

### चार शिष्यसले पाचारण

*(मत्तय ४:१२-२२; लूक ४:१४,१५; ५:१-११)*

14 मंग हेरोद राजानी योहानले कैदखानामा टाकानंतर, येशु
गालीलमा देवना राज्यनी सुवार्ता सांगी राहींता. 15 ✡अनं बोली
राहींता, "येळ पुरी व्हई जायल शे, देवनं राज्य जोडे येल शे! म्हणीसन
पापसपाईन फिरा अनी सांगेल सुवार्तावर ईश्वास ठेवा!"
16 मंग येशु गालील समुद्रना काठवरतीन जाई राहींता, तवय त्यानी
शिमोन अनी त्याना भाऊ आंद्रिया, या मासा धरनारा भाऊसले समुद्रमा
जाळं टाकतांना दखं. 17 येशुनी त्यासले सांगं, "मनामांगे या म्हणजे,
लोकसले देवना राज्यमा कसं लयतस, हाई मी तुमले शिकाडसु."
18 मंग त्यासनी लगेच जाळं तठेच टाकं अनी त्या त्याना मांगे निंघनात.
19 मंग तठेन थोडा पुढे जावानंतर येशुनी जब्दीना पोऱ्या याकोब
अनं योहान ह्या दोन्ही भाऊसले नावमा जाळं सवारतांना दखं. 20 लगेच
त्यानी त्या दोन्ही भाऊसले बलायं तवय त्यासनी त्यासना बाप जब्दीले
त्याना मजुरससंगे नावले सोडीसन त्या येशुना मांगे निंघी गयात.

### दुष्ट आत्मा लागेल माणुस

*(लूक ४:३१-३७)*

21 मंग येशु अनी त्याना शिष्य कफर्णहुम गावले गयात लगेच
त्यानी शब्बाथ दिनले यहूदी लोकसना सभास्थानमा जाईसन प्रचार करा.
22 ✡त्याना प्रचार ऐकीन लोके थक्क व्हई गयात कारण तो शास्त्री†
लोकेसनामायक बोली नही राहींता, तो तर पुरा अधिकार त्यालेच शे
असा प्रचार करी राहींता.
23 तवय तठेच सभास्थानमा दुष्ट आत्मा लागेल माणुस व्हता तो
वरडना, 24 अनी बोलना, "हे येशु नासरेथकर, तुना आमना काय

---

* 1:4 १:४ बाप्तिस्मा पाणीमाईन बुडाईन वर काढाना विधी ✡ 1:11 १:११ मत्तय ३:१७; १२:१८; मार्क ९:७; लूक ३:२२ ✡ 1:15 १:१५ मत्तय ३:२ ✡ 1:22 १:२२ मत्तय ७:२८,२९ † 1:22 १:२२ शास्त्री नियमशास्त्र शिक्षक

संबंधं? तु आमना नाश कराले येल शे का? तु कोण शे, हाई माले
चांगलच माहित शे, तु देवना पवित्र माणुस शे.”
25 येशुनी त्या दुष्ट आत्माले धमकाडीन सांगं, “चुप ऱ्हाय अनी
यानामातीन निंघी जाय!”
26 तवय तो दुष्ट आत्मा जोरमा वरडाले लागना अनी त्या माणुसले
पिळीसन त्यामातीन निंघी गया. 27 हाई दखीसन सर्व लोके चमकाई
गयात अनी त्या एकमेकसले ईचारू लागणात, “हाई काय शे? हाई
काय नवं शिक्षण? तो दुष्ट आत्मासले पण अधिकारतीन आज्ञा देस अनं
त्या त्यानं ऐकतस बी!”
28 येशुनी किर्ती हाई लगेच गालील प्रदेशना चारीमेर वारानामायक
पसरनी.

### येशु बराच लोकसले बरं करस
*(मत्तय ८:१४-१७; लूक ४:३८-४१)*

29 मंग येशु सभास्थानमातीन निंघीसन लगेच याकोब अनी योहान
यासनासंगे शिमोन अनं आंद्रिया यासना घर गया. 30 शिमोननी सासु
तापमा ती खाटवर झोपेल व्हती तिनाबद्दल लगेच त्यासनी येशुले सांगं.
31 तवय येशु तिनाजोडे गया, त्यानी हात धरीन तिले ऊठाडं, लगेच
तिना ताप निंघी गया अनं ती त्यासनी सेवा कराले लागनी.
32 संध्याकाय व्हयनी तवय लोके आजारी अनी दुष्ट आत्मा
लागेलसले येशुकडे लई वनात. 33 अनी शहरना सर्व लोकसनी दारजोडे
गर्दी करी. 34 तवय येगयेगळा आजार व्हयेल लोकसले त्यानी बरं करं.
बराच भूत लागेलसले चांगलं करं अनं तो दुष्ट आत्मा लागेलसले बोलु
दि नही राहींता, कारण तो कोण शे, हाई त्यासले माहित व्हतं.

### येशुना गालीलमा प्रचार
*(लूक ४:४२-४४)*

35 मंग येशु पहाटमा ऊठीसन घरना बाहेर निंघना अनं गावना बाहेर
एकांतमा गया अनी त्यानी तठे प्रार्थना करी. 36 तवय शिमोन अनं
त्याना सोबतना त्याले शोधाले गयात. 37 तो त्यासले सापडना तवय
त्या त्याले बोलनात, “सर्व लोके तुमले शोधी राहीनात.”
38 मंग येशु त्यासले बोलना, “चला आपण जोडेना गावसमा जाऊ
म्हणजे माले तठे प्रचार करता ई, कारण त्यानाकरताच मी येल शे,
हाऊच मना उद्देश शे.”
39 ✡असाच तो पुरा गालील प्रदेशना यहूदी लोकसना सभास्थानमा
प्रचार करत फिरना अनी बराच लोकसमाईन दुष्ट आत्मासले काढं.

### येशु कुष्टरोगी माणुसले शुध्द करस
*(मत्तय ८:१-४; लूक ५:१२-१६)*

40 तवय एक कुष्टरोगी ‡त्यानाकडे वना अनी त्याना समोर पाया
पडीन त्यानी त्याले अशी ईनंती करीसन बोलना, “तुनी ईच्छा व्हई,
तर तु माले शुध्द कर.”
41 तवय येशुले त्यानी किव वनी अनी त्यानी त्याना हात धरीसन
सांगं, “मनी ईच्छा शे, तु शुध्द व्हई जाय.” 42 अनी लगेच त्यानं कुष्ट
निंघी गयं अनं तो शुध्द व्हई गया 43 मंग येशुनी त्याले ताकीद दिसन
लगेच धाडी दिधं. 44 अनी सांगं की, “दख कोणलेच काही सांगु नको.
तर तु स्वतः जाईसन याजकले § दखाड, तुना कुष्टरोग निंघी गया, अनी
शुध्द व्हवानंतर जे अर्पण मोशेनी देवानं ठराई देयल शे; ते अर्पण कर
म्हणजे याजकले खरं पटी.”
45 पण बाहेर जाईसन त्यानी सर्व लोकसले सांगं, त्यामुये येशुनी
इतली प्रसिध्दी व्हयनी की, त्याले शहरमा मोकळं फिरानं कठीण व्हई
गयं, म्हणीन तो एकांतमा ऱ्हावाले गया, तरी पण चारीबाजुतीन लोके
त्यानाकडे ईज राहींतात.

# 2

### येशु लखवा व्हयेल माणुसले बरं करस
*(मत्तय ९:१-८; लूक ५:१७-२६)*

1 थोडा दिन नंतर येशु कफर्णहुम गावमा परत वना, अनी तो घर
शे, हाई लोकसनी ऐकं. 2 तवय त्याना घरमा ईतला लोकसनी गर्दी
करी की, दारमाईन घुसाले सुध्दा जागा नव्हती, तठे जमेल लोकसले
त्यानी संदेश दिधा. 3 तवय लखवा व्हयेल माणुसले चारजण त्यानाकडे
उचलीसन लई वनात. 4 गर्दी इतली व्हयेल व्हती की, त्यानाजोडे
जावाले जागाच नव्हती, म्हणीन त्या घरवर चढनात. येशु जठे उभा
व्हता तठला कौले त्यासनी काढी लिधात अनी जी खाटवर तो लखवा
व्हयेल माणुस झोपेल व्हता त्यासनी ती खाट तठे खाल उतारी दिधी.
5 मी त्याले बरं करसु हाऊ त्यासना ईश्वास दखीसन येशुनी लखवा
व्हयेल माणुसले सांगं, “हे पोऱ्या, तुना पापसनी क्षमा व्हयेल शे.”
6 काही शास्त्री लोके तठे बशेल व्हतात. त्या आपला-आपला मनमा
ईचार कराले लागनात की, 7 “हाऊ असा कसा काय बोलस? हाऊ
तर देवनी निंदा करी राहीना! कोणीच देवना शिवाय पापनी क्षमा करू
शकस नही!”
8 येशुले त्याना आत्मिक दृष्टीघाई लगेच दखायनं की, शास्त्रीसना
मनमा काय ईचार चाली राहिनात. तो त्यासले बोलना, “तुम्हीन आपला
मनमा हाऊ ईचार कसाले करी राहिनात? 9 ‘तुना पापनी क्षमा व्हई गई,’
अस लखवा व्हयेल माणुसले बोलानं की, ‘ऊठ, तुनी खाट उचलीन,
चालाले लाग’ हाई बोलनं, कोणतं सोपं शे? 10 मनुष्यना पोऱ्याले
जगना पापनी क्षमा कराना अधिकार शे,” हाई तुमले समजाले पाहिजे
अस बोलीन येशुनी लखवा व्हयेल माणुसले सांगं, 11 “मी तुले सांगस
की, ऊठ, तुनी खाट उचलीन घर जाय!”
12 मंग तो ऊठना अनी लगेच त्यानी खाट उचलीन सर्व लोकस
समोरतीन गया, हाई दखीन सर्व लोके चमकाई गयात, त्या देवना गौरव
करीसन बोलनात, “आम्हीन अस कधीच दखेल नव्हतं!”

### लेवी नावना माणुसले पाचारण
*(मत्तय ९:९-१३; लूक ५:२७-३२)*

13 मंग येशु परत गालील समुद्रना काठवर गया अनी सर्व लोकसनी
गर्दी त्यानाजोडे वनी. तवय तो त्यासले शिकाडू लागना. 14 मंग
समुद्रना काठवरतीन तो जाई राहिंता, तवय त्यानी अल्फिना पोऱ्या
लेवीले जकात नाकावर बशेल दखं, अनी त्याले सांगं, “चल मनामांगे
ये,” तवय लेवी ऊठीसन त्यानामांगे गया.
15 मंग येशु लेवीना घर जेवाले गया. तठे येशु अनी त्याना
शिष्य यासना पंगतमा बराच जकातदार अनी पापी लोके जेवाले बशेल
व्हतात. कारण असा बराच लोके त्याना मांगे येल व्हतात. 16 तवय
परूशी पंथमधला शास्त्री लोकसनी दखं की, येशु जकातदार अनं पापी
लोकससंगे जेवण करी राहीना, त्या त्याना शिष्यले बोलनात, “हाऊ
असा लोकससंगे का बर जेवण करस?”

✡ **1:39** १:३९ मत्तय ४:२३; ९:३५ ‡ **1:40** १:४० कुष्टरोगी कोड व्हयेल माणुस § **1:44** १:४४ याजक धार्मीक विधी करनारा

17 हाई ऐकीसन येशु त्यासले बोलना, “निरोगी माणुसले वैघनी
गरज ऱ्हास नही, तर आजारी माणुसले ऱ्हास, मी धार्मीक माणससले
नही, तर पापी माणससले बोलावाले येल शे.”

### उपासबद्दल प्रश्न
*(मत्तय ९:१४-१७; लूक ५:३३-३९)*

18 बाप्तिस्मा देणारा योहानना शिष्य अनी परूशी ह्या उपास करतस,
म्हणीन काही लोके ईसन येशुले ईचारू लागनात, “योहानना शिष्य अनी
परूशीसना शिष्य उपास करतस मंग तुमना शिष्य उपास का बर करतस
नही?”
19 येशुनी त्यासले सांगं, “जोपावत वऱ्हाडीसनासंगे नवरदेव शे,
तोपावत त्या उपाशी राहतीन काय? जोपावत नवरदेव त्यासनासंगे शे
तोपावत त्या उपाशी राहूच शकत नही.” 20 पण असा दिन येवाव शे
की, नवरदेव त्यासनापाईन येगळा व्हई, तवय त्या उपास करतीन.
21 कोणी नवा कपडाना तुकडा ठिगळं पडेल जुना कपडाले लावस
नही, लाव तर ठिगळाकरता लायल कपडा जुना कपडाले अजुन फाडी
टाकी अनी ठिगळं अजुन मोठं व्हई जाई. 22 कोणी नवा द्राक्षरस
कातडापाईन बनाडेल जुनी थैलीमा भरीन ठेवस नही. जर तसं करं तर
थैली फाटी जाई, अनी सर्व द्राक्षरस सांडाई जाई. म्हणीसन नवा द्राक्षरस
नवा थैलीमा भरीन ठेवतस.

### शब्बाथ दिनबद्दल प्रश्न
*(मत्तय १२:१-८; लूक ६:१-५)*

23 एकदाव अस व्हयनं की, शब्बाथ दिनले येशु त्याना शिष्यससंगे
वावरमाईन जाई राहींता. जाता जाता शिष्य ओंब्या तोडीन खाई
राहींतात. 24 हाई दखीसन परूशी येशुले बोलनात, “दख, तुना शिष्य
अस कामकरी राहीनात जे शब्बाथ दिनले नियमप्रमाणे करतस नही!”
25 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “तुम्हीन कधी हाई वाचं नही का?
की, जवय दावीद राजा अनी त्यानासंगे ज्या व्हतात, त्यासले भूक
लागनी अनं त्यासनाजोडे खावाले काहीच नव्हतं तवय दावीद राजाने
काय करं, 26 कशा तो देवना मंदिरमा गया अनी देवले अर्पण करेल
भाकरी ज्या याजकशिवाय कोणीच खातस नही. त्या त्यानीपण खाधात
अनी त्यानासंगे ज्या व्हतात, त्यासले पण खावाड्यात, हाई अब्याथार
हाऊ जवय महायाजक व्हता, तवय हाई घडनं की नहीं?”
27 आखो तो त्यासले बोलना, “शब्बाथ दिन हाऊ माणससंना
चांगला करता बनाडेल शे; माणुस शब्बाथ दिनकरता नही.” 28 यामुये
मनुष्यना पोऱ्या शब्बाथ दिनना धनी शे.

# 3

### येशु लुळा हातना माणुसले बरं करस
*(मत्तय १२:९-१४; लूक ६:६-११)*

1 परत येशु सभास्थानमा गया, तठे लुळा हातना एक माणुस व्हता.
2 तो शब्बाथ दिन व्हता येशु त्या माणुसले बरं करस की काय करस; हाई
दखाकरता काही लोके टपेल व्हतात. म्हणजे त्यानावर आरोप करानी
संधी त्यासले भेटी असा त्यासना बेत व्हता. 3 येशुनी त्या लुळा हातना
माणुसले सांगं “ऊठ, मजारमा उभा ऱ्हाय.”
4 मंग त्यानी त्या लोकसले ईचारं, “नियमशास्त्रप्रमाणे शब्बाथ दिनले
एखादाले मदत करानं चांगलं की, वाईट करानं चांगलं? जीव वाचाडानं
चांगलं की, जीव लेवानं चांगलं?” पण त्या गप्पच राहीनात. 5 मंग
येशुनी संतापमा चारीबाजुले दखं अनी त्या लोकसना कठीण मनले
दखीसन त्याले दुःख वाटनं, त्यानी लूळा हातना माणुसले सांगं, “तुना
हात सरळ कर” त्यानी हात सरळ करा, अनी त्याना हात बरा व्हयना.
6 तवय परूशी लगेच बाहेर निंघी गयात अनी येशुले मारी टाकानी
योजना आखाकरता त्यासनी हेरोदीया नावना राजकीय पक्षनी भेट
लिधी.

### येशुना मांगे लोकसनी गर्दी

7 मंग येशु त्याना शिष्यससंगे गालील समुद्रकडे गया, तवय
गालील शहरमातीन लोकसनी गर्दी त्यानामांगे गयी, 8 अनी यहूदीया,
यरूशलेम, ईदोन अनं यार्देन नदीना पलीकडला सर्व गावे अनी सोर
अनं सिदोन यासना जवळना प्रदेशना लोकसनी गर्दीनं गर्दी त्यानी
करेल कामसविषयीन्या गोष्टी ऐकीसन त्यानाकडे वनी. 9 ✡त्याना
आजुबाजूले लोके गर्दी करीसन चेंगरी टाकतीन म्हणीसन त्यानी
शिष्यसले पहिलेच एक नाव तयार करीसन ठेवाले सांगं. 10 कारण
त्यानी बराच लोकसले बरं करेल व्हतं. म्हणीसन जेवढा रोगी लोके
व्हतात त्या त्याले स्पर्श कराले गर्दी करी राहीतात. 11 जवय जवय
दुष्ट आत्मा लागेल लोके त्याले दखेत तवय त्यानापुढे पडी जायेत अनी
जोरमा वरडीन म्हणेत, “तू देवना पोऱ्या शे!”
12 तवय तो त्यासले ताकिद दिसन सांगे, मी कोण शे हाई प्रकट करू
नका.

### येशु बारा प्रेषितसनी निवड करस
*(मत्तय १०:१-४; लूक ६:१२-१६)*

13 मंग येशु डोंगरवर चढना अनी त्याले ज्या माणसे पाहिजे व्हतात
त्यासले त्यानी बलायं अनं त्या त्यानाकडे वनात, 14 तवय त्यानी
त्यासनामाईन बारा जणसले निवडं अनी त्यासले प्रेषित *हाई नाव दिधं,
ह्यानाकरता की, त्या त्यानासंगे राहतीन अनं तो त्यासले प्रचार कराले
धाडी. 15 अनी त्यासले दुष्ट आत्मा काढाना अधिकार राही.
16 ह्या बारा जणसले त्यानी निवाडं; ते अस त्यानी शिमोनले पेत्र
हाई नाव दिधं. 17 याकोब अनी त्याना भाऊ योहान ह्या जब्दीना
पोऱ्यासले येशुनी बोआनेर्गेश, म्हणजे “गर्जनाना पोऱ्या” अस नाव
दिधं; 18 आंद्रिया, फिलीप्प, बर्थलमय, मत्तय, थोमा, अल्फीना पोऱ्या
याकोब, तद्दय, शिमोन कनानी हाऊ रोमी शासन विरोधी. 19 अनं येशुले
धरी देणारा यहुदा इस्कर्योत.

### येशु अनी बालजबुल
*(मत्तय १२:२२-३२; लूक ११:१४-२३; १२:१०)*

20 मंग येशु घर वना पण तठे बी लोकसनी ईतली गर्दी करी की,
त्याले अनं त्याना शिष्यसले जेवाले सुध्दा येळ नव्हती. 21 हाई गोष्ट
त्याना घरनासना कानवर गयी, तवय त्या त्याले घर लई जावाकरता तठे
वनात, त्या सांगी राहींतात, त्याले येड लागेल शे.
22 ✡पण यरूशलेम शहरतीन येल शास्त्री सांगेत, “बालजबूलनी
†त्याले पछाडेल शे! म्हणीसन त्याले दुष्ट आत्मा काढता येतस.”
23 येशुनी त्यासले जोडे बलायं अनी दृष्टांतमा सांगु लागना की,
“सैतानच सैतानले कशा काढु शकस? 24 एखादा राज्यमा फुट पडनी
तर ते टिकू शकस नही. 25 एखादा घरमा फुट पडनी तर ते घर बी

---

✡ **3:9** ३:९ मार्क ४:१; लूक ५:१-३ * **3:14** ३:१४ प्रेषित सेवा कराकरता धाडेल शिष्य ✡ **3:22** ३:२२ मत्तय ९:३४; १०:२५ † **3:22** ३:२२ बालजबूलनी दुष्ट आत्मासना राजा

टिकु शकस नही. 26 सैतानच स्वतःना राज्यमा फुट पाडी तर असामा
त्याना टिकाव लागाव नही, त्याना शेवट व्हई.
27 “एखादाले, पहीलवान माणुसनी घरनी संपत्ती लुटनी व्हई तर
पहिले त्याले त्या पहीलवान माणुसले बांधनं पडी तरच तो त्याना घरनी
संपत्ती लुटू शकस.
28 “मी तुमले सत्य सांगस की, लोकसनी करेल सर्व पापसनी अनं
त्यासनी करेल देवनी निंदा यासनी बी क्षमा त्यासले भेटी जाई 29 ✡पण
जो बी पवित्र आत्मानी निंदा करी त्यानी कधीच क्षमा व्हवाव नही तो
सार्वकालिक पापना भागीदार राही.” 30 “त्याले सैताननी पछाडेल
शे,” असा त्या बोली राहींतात म्हणीसन येशु अस बोलना.

### येशुना परीवार
*(मत्तय १२:४६-५०; लूक ८:१९-२१)*

31 तवय येशुनी माय अनी त्याना भाऊ, बहिण तठे वनात, त्यासनी
बाहेर उभा राहिन त्याले निरोप धाडा. 32 येशुना बाजुले बराच लोके
बशेल व्हतात, त्यासनी त्याले सांगं, “दख, तुनी माय अनं तुना भाऊ,
बहिण बाहेर तुनी वाट दखी राहीनात.”
33 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “कोण मनी माय? अनी कोण मना
भाऊ?” 34 मंग त्यानी तठे बशेल लोकसकडे दखीसन सांगं, “दखा!
हाई मनी माय अनी ह्या मना भाऊ, बहिण! 35 कारण जो देवनी
ईच्छाप्रमाणे वागस तोच मना भाऊ अनं बहिण, अनी तीच मनी माय.”

# 4

### पेरणी करनाराना दृष्टांत
*(मत्तय १३:१-९; लूक ८:४-८)*

1 ✡परत येशु गालील समुद्रना काठवर उपदेश करू लागना, अनी
त्यानाजोडे लोकेसनी ईतली मोठी गर्दी जमनी की, तो एक नावमा जाईन
बसना अनी सर्व लोके समुद्रना काठवर उभा व्हतात. 2 दृष्टांत *दिसन
बऱ्याच गोष्टी शिकाडु लागना अनी आपला उपदेशमा तो त्यासले
बोलना;
3 “ऐका! एक शेतकरी पेरणी कराकरता गया. 4 तो पेरणी करी
राहिंता तवय काही दाना वाटवर पडनात त्यासले पक्षीसनी ईसन खाई
टाकं. 5 काही दाना खडकाळ जमीनवर पडणात त्या लवकर उगनात
पण तठे जास्त खालपावत माटी नव्हती म्हणीन त्यासले मुळकांड्याच
वन्यात नहीत. 6 अनी जवय, सुर्य उगना तवय त्यासले ऊन लागनं
अनं त्या सुकाई गयात. 7 काही दाना काटेरी झुडपसमा पडनात. त्या
उगनात पण काटेरी झुडूप इतलं वाढनं की, त्या पिकले वाढुच दिधं
नही म्हणीन पिक काय वनं नही. 8 काही दाना चांगली जमीनवर
पडनात त्या उगनात, मोठा व्हईसन त्याले चांगलं पिक वनं; म्हणजे
कोठे तिसपट, कोठे साठपट, तर कोठे शंभरपट पिक वनं.”
9 मंग येशु बोलना, “ज्याले कान शे, तो ऐको!”

### दृष्टांत सांगानं कारण
*(मत्तय १३:१०-१७; लूक ८:९,१०)*

10 मंग जवय येशु एकटा व्हता, तवय त्याना बारा शिष्य अनं
बाकीना शिष्यसनी त्याले ईचारं, दृष्टांतना अर्थ काय शे. 11 तवय येशुनी
त्यासले उत्तर दिधं, “देवराज्यना रहस्यनी माहिती करी लेवानी तुमले
मोकळीक शे,” पण ज्या देवराज्यना बाहेर शेतस त्यासले सर्वकाही
दृष्टांत दिसनच सांगनं पडी.
12 “त्या लोके डोयासघाई दखतीन;
कानघाई ऐकतीन,
तरी त्यासले काहीच समजाव नही;
पण जर त्यासनी समजी लिधं तर
त्या देवकडे वळतीन
अनी त्यासले माफी भेटु शकस.”†

### पेरणीना दृष्टांतना अर्थ
*(मत्तय १३:१८-२३; लूक ८:११-१५)*

13 येशु आखो त्यासले बोलना, “तुमले या दृष्टांतना अर्थ नही
समजना? तर, सर्व दृष्टांत कशा समजतीन? 14 शेतकरी पेरस ते
देवनं वचन शे. 15 काही लोके पाय वाटनामायक शेतस अनी त्या
दाना म्हणजे देवनं वचन, त्यासना कानवर वचन पडस नही पडस तोच
सैतान येस अनी त्यासना मनमा पेरेल वचनले हिराई लेस. 16 खडकाळ
जमीनवर पेरेल दाना म्हणजे आनंदमा देवनं वचन स्विकारनारा लोके,
खडकाळ जमीनवर पेरेल रोपटासले खालपावत मूळ धरता येस नही.
तसा या लोकसना मनमा देवनं वचन खोलवर जाऊ शकस नही. 17 त्या
रोपे वाढतस पण त्यासना मुळंच निंघतस नही म्हणीन त्या जास्त काळ
टिकतस नही, देवनं वचनना स्विकार करामुये त्यासनावर संकटे येवाले
लागनात, त्यासना छळ होऊ लागना म्हणजे त्या अडखळाले लागतस.
18 काही लोके काटेरी झुडपसमा पेरेलनामायक शेतस म्हणजे त्या
देवना वचन ऐकतस, 19 पण लवकरच त्यासले संसारनी चिंता, पैसानी
चिंता अनं इतर गोष्टीसना लोभ त्यासले भुरळ पाडस अनी त्यासना
मनमधला देवना वचननी वाढ व्हस नही अनी त्यासले ते बिनकामनं
करी टाकस. 20 त्यानापेक्षा ज्या चांगली जमीननामायक शेतस की,
ज्या देवनं वचन ऐकीन त्याना स्विकार करतस ह्याच लोके तिसपट,
साठपट अनं शंभरपट पिक देतस.”

### दिवावरतीन दृष्टांत
*(लूक ८:१६-१८)*

21 ✡मंग येशुनी त्यासले ईचारं, “दिवा लाईसन चंपानाखाल किंवा
खाटना खाल ठेवाकरता लावतस का? त्याना उजेड पडाले पाहिजे
म्हणीसन त्याले दिवठणीवर ठेवाकरता लावतस की नहीं? 22 ✡ज्या
देवराज्यना रहस्य तुमले आज गुप्त वाटतस, त्या आज नही सकाय
तुमनासमोर उघड व्हईच, ह्यानी खात्री बाळगा.” 23 “ज्यासले ऐकाले
कान शेतस, त्यासनी ऐकी ल्या!”
24 ✡परत येशुनी त्यासले सांगं, “तुम्हीन जे ऐकतस ते नीट ध्यानमा
ल्या, ज्या नियमतीन तुम्हीन न्याय करशात, त्याच नियमघाई देव तुमना
न्याय करी अनी त्यानापेक्षा बी वाईट करी. 25 ✡कारण ज्यानाजोडे शे,
त्याले अजुन भेटी अनी ज्यानाकडे नही शे, त्यानाकडे जे व्हई, ते पण
त्यानाकडतीन काढी लेतीन.”

### उगवनारा पिकना दृष्टांत

---

✡ **3:29** ३:२९ लूक १२:१० ✡ **4:1** ४:१ लूक ५:१-३ * **4:2** ४:२ दृष्टांत म्हणजे स्वर्गमाधल्या गोष्टीसले त्यासले जगीक दृष्टांत देनं † **4:12** ४:१२ “त्या लोके डोयासघाई दखतीन; कानघाई ऐकतीन, तरी त्यासले काहीच समजाव नही; पण जर त्यासनी समजी लिधं तर त्या देवकडे वळतीन अनी त्यासले माफी भेटु शकस.” यशया 6:9-10 ✡ **4:21** ४:२१ मत्तय ५:१५; लूक ११:३३ ✡ **4:22** ४:२२ मत्तय १०:२६; लूक १२:२ ✡ **4:24** ४:२४ मत्तय ७:२; लूक ६:३८ ✡ **4:25** ४:२५ मत्तय १३:१२; २५:२९; लूक १९:२६

26 आखो येशु बोलना, “देवनं राज्य अस शे की, जसं एक
शेतकरीनी वावरमा पेरणी करी. 27 अनी पिक येवाकरता त्यानी
काहीच करं नही फक्त रातले झोपे, सकायले ऊठे, पण इकडे वावरमा
पिक उगनं, ते कश उगनं, हाई त्याले समजणं नही. 28 जमीनमा
आपोआप पिक उगस, पहिले अंकुर मंग कणीस, मंग कंससमा दाणा
भरावतस. 29 अस पिक तयार व्हवानंतर कापणीनी येळ येस तवय
शेतकरी ईळा लावस.”

### मोहरीना दाणाना दृष्टांत

*(मत्तय १३:३१,३२,३४; लूक १३:१८,१९)*

30 आखो येशु बोलना, “मी देवना राज्यले कसानी उपमा देऊ?”
“कोणता दृष्टांत सांगीसन त्यानं वर्णन करू? 31 देवनं राज्य हाई मोहरीना
दाणाना मायक शे, जो जमीनमा पेरणारा दानासमा पृथ्वीवरला सर्वात
धाकला दाना र्‍हास. 32 तरी पण पेरा नंतर तो जवय उगस तवय बाकीना
रोपटास पेक्षा त्यान्या फांघा ईतल्या मोठ्या वाढतस की, त्याना फांघावर
सावलीमा पक्षीपण घरटा बांधीसन राहतस.”
33 त्यासनी समजी लेवानी क्षमता ध्यानमा लिसन त्यानी त्यासले
बराच दृष्टांत सांगीन संदेश दिधा. 34 लोकससंगे जवय तो शिकाडे तवय
तो दृष्टांत सांगीसनच शिकाडे, एकांतमा तो त्याना शिष्यसले सर्व दृष्टांत
समजाडीसन सांगे.

### येशु वादयले शांत करस

*(मत्तय ८:२३-२७; लूक ८:२२-२५)*

35 त्याच दिन संध्याकाय व्हवावर येशुनी शिष्यसले सांगं, “आपण
समुद्रना पलीकडे जाऊ.” 36 मंग लोकसले सोडीन तो जी नाववर
बशेल व्हता त्याच नावमा त्याना शिष्य त्याले संगे लई गयात.
त्यासनासंगे बाकिन्या नावपण व्हत्यात. 37 थोडा येळमा मोठं वादय
सुरू व्हयनं अनं मोठं-मोठल्या लाटा नाववर आदळाले लागनात.
त्यामुये नावमा पाणी भराले लागनं. 38 येशु नावना मांगला बाजुले
उशीवर डोकं ठिन गाड झोपेल व्हता, तवय शिष्यसनी त्याले ऊठाडं
अनी त्या बोलनात, “गुरजी आपण सर्वाजन मरी जासुत ह्यानी तुमले
चिंता नही का?”
39 तवय येशु ऊभा राहिना, त्यानी वादयले आज्ञा करी, “शांत व्हई
जा!” अनी लाटासले तो बोलना, “थांबी जाय,” तवय वादय बंद व्हई
गयं अनी शांतता पसरी गयी. 40 येशुनी शिष्यसले ईचारं, “तुम्हीन
ईतला का बरं घाबरी जातस? तुमले अजुन बी ईश्वास नही का?”
41 मंग शिष्य भलताच घाबरी गयात अनी एकमेकसले सांगु
लागनात, “हाऊ शे तरी कोण? वादय अनी लाटा या पण ह्यानी आज्ञा
पाळतस!”

## 5

### येशु दुष्ट आत्मा लागेल माणुसले बरा करस

*(मत्तय ८:२८-३४; लूक ८:२६-३९)*

1 मंग येशु अनी त्याना शिष्य गालील समुद्रना पलिकडला
गरसेकरसना प्रदेशमा वनात. 2 येशु नावमातीन उतरना, तवय
एक दुष्ट आत्मा लागेल माणुस कब्रस्तान माईन ईसन त्याले
भेटना. 3 तो कब्रस्तानमाच राहे अनं साखळ्याघाई बांधीनसुध्दा
तो कोनाचघाई आवराये नही; 4 कारण त्याले बराचदाव बेड्यासघाई
अनी साखळ्याघाई बांध तरी तो साखळ्या तोडी टाके अनं बेड्यासना
चुराडा करे, त्याले आवरानी ताकद कोनामाच नव्हती. 5 तो रातदिन
कब्रस्तानमा अनं डोंगरंसमा वरडत फिरे, स्वतःले दगडसघाई ठेचीले.
6 जवय त्यानी येशुले दुरतीन दखं, तवय तो पयत ईसन त्याना समोर
पाया पडीन; 7 अनी जोरमा वरडीन बोलना, “हे येशु, परमप्रधान देवना
पोऱ्या! तुले मनाकडतीन काय तरास शे? मी तुले देवनी शपथ घालस,
तू माले शिक्षा देऊ नको!” 8 कारण येशु त्याले बोलना व्हता, “हे दुष्ट
आत्मा, ह्या माणुस माईन निंघी जाय!”
9 येशुनी त्याले ईचारं, “तुनं नाव काय शे?” तो बोलना, “मनं
नाव ‘सैन्य’ शे, कारण आम्हीन बराच शेतस!” 10 अनी आमले ह्या
प्रदेशमाईन काढु नको; अशा ईनंत्या दुष्ट आत्मासनी येशुले कऱ्यात.
11 तठेच डोंगरजोडे डूकरंसना मोठा कळप चरी राहींता. 12 दुष्ट
आत्मासनी त्याले ईनंती करी की, “आमले त्या डुकरंसमा घुसू दे.”
13 त्यानी त्यासले परवानगी दिधी. मंग त्या दुष्ट आत्मा त्या माणुस
मातीन निंघीसन डुकरंसमा घुसनात अनी त्या जवळपास दोन हजार
डुकरे व्हतात. त्या पयत जाईसन कडावरतीन समुद्रमा पडीसन मरनात.
14 मंग डुकरं चारनारासनी पयत जाईसन हाई बातमी गावमा अनं
वावरंसमा लोकसले सांगी. तवय काय व्हयनं हाई दखाकरता लोके
तठे वनात. 15 तवय त्या येशु जोडे वनात, अनी त्यासनी ज्यानामा दुष्ट
आत्मा व्हतात म्हणजेच सैन्य व्हतं. त्याले शुध्दीवर येल अनं कपडा
घालेल दखं, तवय त्यासले भिती वाटनी. 16 ज्यासनी डोयासघाई
दुष्ट आत्मा लागेल माणुसनी अनी डुकरंसनी हकीकत दखेल व्हती ती
त्यासले सांगी.
17 तवय त्या ईनंती करीसन येशुले सांगु लागनात, तुम्हीन आमना
प्रदेशमातीन निंघी जा.
18 मंग तो नावमा बसताच, बरा व्हयेल माणुस त्याले ईनंती करीसन
बोलना, “मालेपण तुमनासंगे लयी चला!”
19 पण त्यानी त्याले येऊ दिधं नही. तर त्याले सांगं, तु घर जाय,
आपला लोकसले सांगं, तुनावर दया करीसन प्रभुने तुनाकरता कितलं
मोठं कार्य करेल शे.
20 मंग दुष्ट आत्मा लागेल माणुसनी घडेल सर्व कार्य येशुनी जे
त्यानाकरता करेल व्हतं, ते तो सर्व दकापलीस म्हणजे दहा गावसना
शहरमा जाईसन सांगाले लागना, तवय सर्व लोकसले आश्चर्य वाटनं.

### मरेल पोर अनी रक्तस्रावी बाई

*(मत्तय ९:१८-२६; लूक ८:४०-५६)*

21 मंग येशु नावमा बशीसन परत पलीकडला काठवर गया. तठे
त्यानाजोडे लोकसनी मोठी गर्दी जमनी तवय तो समुद्रजोडेच व्हता.
22 याईर नावना एक सभास्थानना अधिकारी तठे वना अनं येशुले
दखीसन त्याना पाया पडना. 23 तवय तो येशुले कळकळ करीसन
ईनंती करू लागना की, “मनी धाकली पोर मराले टेकेल शे. ती वाचाले
पाहिजे म्हणीसन तुम्हीन ईसन तिना डोकावर हात ठेवा!”
24 मंग येशु त्यानासंगे जावाले निंघना तवय लोकसनी मोठी गर्दी
बी त्याना मांगे निंघनी. अनी त्यासनी त्याना आजुबाजू गर्दी करी.
25 ती गर्दीमा एक बाई व्हती तिले बारा वरीस पाईन रक्तस्रावना
आजार व्हता, 26 तिनाजोडे व्हतं नव्हतं तितलं सगळंच खर्चाई जायल
व्हतं. तिले बराच तरास व्हता म्हणीन तिनी वैद्यसकडतीन ईलाज करा
तरी फरक पडना नही, उलटा आजार जास्तीज वाढी जायेल व्हता.
27 ती येशु बद्दलन्या गोष्टी ऐकीसन त्या गर्दीमा घुसनी अनी त्यानाकडे

ईसन त्याना कपडासले हात लाया, 28 कारण ती सांगे, “मी याना
कपडासले जरी हात लावसु तरी बरी व्हसु.”
29 तवय लगेच तिना रक्तस्राव बंद व्हई गया अनं तिना शरिरले
जानवणं मी या आजारपाईन मुक्त व्हई जायल शे. 30 तवय येशुनी
हाई लगेच वळखं की, आपलामातीन शक्ती निंघनी, तवय त्यानी मांगे
वळीन गर्दीमा ईचारं, “मना कपडासले कोणी हात लाया?”
31 पण त्याना शिष्य त्याले बोलनात, “लोकसनी गर्दी आपला
आजुबाजूले शे हाई तुम्हीन दखी राहीनात; तरी माले कोणी हात लाया,
हाई कसं काय ईचारी राहीनात?”
32 तरी बी हाई कोणी करं, हाई दखाकरता येशुनी चारीबाजुले नजर
फिराई. 33 तवय ती बाई तिनासंगे जे काही घडेल व्हतं. तिनी ते वळखं
अनी घाबरीसन अनं थरथर कापत त्यानापुढे वनी अनी गुडघा टेकिन
त्यानापुढे पडीसन तिनी त्याले घडेल सर्वकाही खरंखरं सांगं. 34 येशु
तिले बोलना, “बाई, तुना ईश्वासनी तुले बरं करेल शे. सुखरूप जाय,
तुना आजारपाईन तु मुक्त शे.”
35 येशु हाई बोली राहींता ईतलामा तठे सभास्थानना अधिकारीना
घरतीन काही लोकसनी ईसन अधिकारीले सांगं की, “तुमनी पोर मरी
गई. आत्ते गुरजीले कशाले तरास देतस.”
36 तवय येशुनी त्यासनं बोलनं ऐकं, पण त्यासनाकडे ध्यान नही
देता तो सभास्थानना अधिकारीले बोलना, “घाबरू नको, ईश्वास ठेव.”
37 तवय त्यानी पेत्र, याकोब, अनं याकोबना भाऊ योहान यासना
शिवाय त्यानी आपलासंगे कोणलेच येऊ दिधं नही. 38 अनी त्या
अधिकारीना घरना जोडे येताच येशुनी हंबरडा फोडीन रडणारासना अनं
शोक करणारसना गोंधळ व्हयेल दखा. 39 तो मजार जाईसन त्यासले
बोलना, “तुम्हीन कसाले रडतस अनी गोंधळ करतस? पोर मरेल नही,
झोपेल शे!”
40 तवय त्यासनी त्यानी थट्टा करी, पण त्यानी त्या सर्वासले बाहेर
काढी दिधं अनी पोरना माय बापले अनी आपला तिन शिष्यसले लिसन
पोर व्हती त्या खोलीमा गया. 41 मंग त्या पोरना हात धरीसन तो बोलना,
“तलिथा कुम” याना अर्थ, “पोरी, मी तुले सांगस ऊठ!”
42 ती बारा वरीसनी पोर लगेच ऊठीसन चालाले लागनी त्या हाई
दखीसन चमकाईनात. 43 हाई बात कोणलेच सांगु नका अस येशुनी
त्यासले बजाईन सांगं, अनी “हिले काहीतरी खावाले घा” अस तो
त्यासले बोलना.

# 6

## येशुले नासरेथ गावमा नकारतस
*(मत्तय १३:५३-५८; लूक ४:१६-३०)*

1 मंग येशु तठेन निंघीसन आपला नासरेथ गावले परत वना, अनं
त्यानामांगे त्याना शिष्य बी तठे वनात. 2 तो जवय शब्बाथ दिनले
सभास्थानमा शिकाडी राहिंता तवय तठला लोके त्यानं ऐकीन थक्क
व्हईसन बोलनात की, ह्या सर्व गोष्टी ह्याले कोठेन मिळण्यात? ह्याले
काय हाई बुध्दी देवामा येल शे? अनी हाऊ चमत्कार कशा करस?
3 अनं जो सुतार शे, अनी मरीयाना पोऱ्या अनी याकोब, योसेफ,
यहुदा, शिमोन, ह्यासना भाऊ तो हाऊच शे ना? त्यान्या बहिणी या
आपलाबरोबर शेतस ना? म्हणीन त्यासनी त्याले नकार.
4 ✡येशु त्यासले बोलना, जो संदेष्टा ऱ्हास, त्याले आपला घरमा,
नातलगसमा अनं आपला गावमा मानपान भेटस नही पण दुसरा लोके
त्यासना सन्मान करतस.
5 त्यानी तठे थोडाच आजारीसले हात ठेईन बरं करं, यानाशिवाय
त्याले तठे कोणताच चमत्कार करता वना नही.

## बारा प्रेषितसले प्रचारले धाडं
*(मत्तय १०:५-१५; लूक ९:१-६)*

6 त्यासनी येशुवर ईश्वास ठेया नही म्हणीन त्याले आश्चर्य वाटनं.
तवय तो प्रचार करत गाव-गाव फिरना. 7 मंग येशुनी बारा शिष्यसले
बलाईसन त्यासले दुष्ट आत्मा काढाना अधिकार दिधा अनी दोन दोन
जणसनी जोडी करीसन त्यासले धाडी दिधं 8 अनी त्यानी त्यासले आज्ञा
करी की, “प्रवासकरता काठी शिवाय काहीच लई जाऊ नका भाकर,
झोळी अनं कमरबंदमा पैसा लई जाऊ नका. 9 तरी पायमा जोडा घालीन
चाला अनी संगे सदरा लेवु नका.” 10 आखो तो त्यासले बोलना,
“ज्या घरमा तुमनं स्वागत करतीन त्याच घरमा गाव सोडा पावत ऱ्हावा.
11 ✡✡अनी ज्या गावना लोके तुमना स्विकार करावं नही अनी तठला
कोणीच तुमनं ऐकाऊत नही तवय तठेन निंघाना येळले तुमना पायनी
धुळ तठेच झटकी टाका. कारण ती त्यासले चेतावणी राही.”
12 त्यासनी तठेन जाईसन लोकसले प्रचार करीसन सांगं, “पाप
सोडा अनी देवकडे वळा.” 13 ✡त्यासनी बराच दुष्ट आत्मा काढात
अनी बराच आजारीसले तेल लाईन बरं करं.

## बाप्तिस्मा करनारा योहाननी हत्या
*(मत्तय १४:१-१२; लूक ९:७-९)*

14 ✡येशुबद्दल हेरोद राजानी ऐकं कारण त्यानं नाव गाजेल व्हतं
अनी काही लोके अस म्हणी राहींतात, “बाप्तिस्मा करनारा योहान मरेल
मातीन जिवत व्हयेल शे, म्हणीसन हाई चमत्कारनी शक्ती त्यानामा कार्य
करी राहीनी.”
15 कोणी त्याले “एलिया” म्हणे तर कोणी म्हणेत संदेष्टा शे म्हणजेच
“जुना संदेष्टासना मायक एक शे.”
16 पण हेरोद हाई ऐकीसन बोलना, “हाऊ बाप्तिस्मा करनारा योहान
शे! ज्याना मी शिरच्छेद करा, तो हाऊ योहान जिवत व्हयेल शे!”
17 ✡हेरोदनी माणसे धाडीसन योहानले पकडीन कैदखानामा ठेयेल
व्हतं. कारण त्याना भाऊ फिलीप्प यानी बायको हेरोदीया हिनासंगे
हेरोद राजानी लगीन करेल व्हतं. 18 अनी बाप्तिस्मा करनारा योहान
हेरोदले सांगे, “तु तुना भाऊनी बायकोसंगे लगीन करं, हाई अयोग्य
शे.”
19 यामुये हेरोदिया हाई योहानना व्देष करे, तीनी त्याले मारानी
ईच्छा व्हती पण हेरोदमुये तिले काहीच करता वनं नही. 20 योहान
हाऊ धार्मीक अनं पवित्र माणुस शे हाई हेरोदले माहित व्हतं म्हणीन तो
त्याले घाबरे अनं त्यानं रक्षण करे. तो जे काही बोले ते ऐकीसन हेरोद
गोंधळी जाये, पण तरी तो आनंदमा त्यानं ऐकी ले.
21 शेवट एक दिन हेरोदिया हिले तिनी संधी भेटनी, कारण त्या दिन
हेरोदना जन्मदिन व्हता. त्यानी सरदार, प्रधान, अनं गालील प्रांतमाधला
मोठा लोकसले जेवणनं निमंत्रण दिधं. 22 मंग हेरोदिया हिना पोरनी
स्वतः मजार राजवाडामा जाईसन नाचगाणा करीसन हेरोदनासंगे जेवणले
बसेल सर्वासले खूश करं, तवय राजा त्या पोरले बोलना, “तुले जे काही
पाहिजे ते मनाकडे मांग म्हणजे मी ते तुले दिसु.” 23 तो वचन दिसन

✡ **6:4** ६:४ योहान ४:४४ ✡ **6:11** ६:११ प्रेषित १३:५१ ✡ **6:11** ६:११ लूक १०:४-११ ✡ **6:13** ६:१३ याकोब ५:१४ ✡ **6:14** ६:१४ मत्तय १६:१४; मार्क ८:२८; लूक ९:१९ ✡ **6:17** ६:१७ लूक ३:१९,२०

बोलना, “मी शपथ खाईसन सांगस की, मना अर्धा राज्य पावत जे काही
तु मांगशी ते मी तुले दिसु!”
24 तवय ती पोरनी बाहेर जाईसन आपली मायले ईचारं, “मी काय
मांगु?” तवय ती बोलनी, “बाप्तिस्मा करनारा योहाननं मुंडकं.”
25 मंग तिनी लगेच पयत जाईसन राजाले सांग, “बाप्तिस्मा करनारा
योहाननं मुंडकं ताटमा ठेईसन मनाकरता आत्तेच लई या अशी मनी
ईच्छा शे!”
26 तवय राजा भलताच नाराज व्हयना कारण त्यानी देयल शपथमुये
अनी तठे जेवणले बशेल लोकसनामुये त्याले तिले नकार देता वना
नही. 27 तवय राजानी लगेच शिपाईले कैदखानामा धाडीसन बाप्तिस्मा
करनारा योहाननं मुंडकं लयानी आज्ञा करी. तवय त्यानी कैदखानामा
जाईन त्यानं मुंडकं कापं, 28 अनी मुंडकं ताटमा ठेईसन त्या पोरले
आणी दिधं अनी ती पोरनी ते आपली मायले दिधं. 29 जवय बाप्तिस्मा
करनारा योहानना शिष्यसले हाई बातमी कळनी तवय त्यासनी त्याना
प्रेत उचलीसन कबरमा ठेवं.

### पाच हजार लोकसले जेवण

*(मत्तय १४:१३-२१; लूक ९:१०-१७; योहान ६:१-१४)*

30 त्यानंतर प्रेषित येशुले परत ईसन भेटनात अनं त्यासनी जे काही
करेल व्हतं अनी शिकाडेल व्हतं ते सर्वकाही त्यासनी त्याले सांगं.
31 तठे भरपुर लोके ये जा करी राहींतात त्यामुये येशुले अनी त्याना
शिष्यसले जेवाले सवड भेटी नही राहींती. तवय तो त्यासले बोलना,
“थोडा आराम कराले एकांतमा चला.” 32 मंग त्या नावमा बशीन
एकांतमा निंघी गयात.
33 तवय लोकसनी त्यासले दखी लिधं बराच जणसनी त्यासले
वळखी लिधं अनी तठला गावमधला लोके पायी चालीसन अनं
पयत जाईसन येशु अनी त्याना शिष्यसना पहिलेच तठे पोहची गयात.
34 ✡येशु नावमातीन उतरना तवय त्यानी लोकसनी गर्दी दखी, तवय
त्याले त्यासनी किव वनी कारण त्या बिगर मेंढपाळना भटकेल मेंढरंसना
मायक व्हई जायेल व्हतात. म्हणीन तो त्यासले बराच गोष्टी शिकाडु
लागना. 35 जवय बराच उशीर व्हयना तवय, शिष्य येशुकडे ईसन
बोलनात, “हाई एकांतनी जागा शे, अनी बराच उशीर व्हयेल शे.
36 म्हणीन त्यासले जाऊ द्या म्हणजे लोके आसपासना खेडापाडा अनं
गावमा जाईसन स्वतःकरता जेवण ईकत लेतीन.”
37 पण येशुनी शिष्यसले उत्तर दिधं, “तुम्हीनच त्यासले खावाले
द्या,” तवय त्या बोलनात, “आम्हीन दोनशे चांदिना शिक्कासण्या*
भाकरी ईकत लईसन त्यासले खावाले देऊत का?”
38 येशु त्यासले बोलना, “तुमना जोडे कितल्या भाकरी शेतस?
जाईसन दखा,” त्या दखीसन बोलनात, “पाच भाकरी अनी दोन मासा
शेतस.”
39 मंग येशुनी शिष्यसले सांगं अनी त्यासनी सर्व लोकसले हिरवा
गवतवर पंगतमा बसाले लायं. 40 तवय त्या शंभर शंभर अनी पन्नास
पन्नासन्या पंक्तीसमा बसनात. 41 तवय येशुनी त्या पाच भाकरी अनी
दोन मासा लिसन त्यावर स्वर्गकडे दखीसन आशिर्वाद मांगा, अनी
भाकरी मोडीसन शिष्यना जोडे त्यासले वाढाले दिध्यात अनी त्यानी
त्या दोन मासा बी सर्वासले वाढाले दिधात. 42 मंग सर्व लोकसनी
पोटभर जेवण करं. 43 अनी शिष्यसनी उरेल मासान्या अनं भाकरीसना
बारा डालक्या भरीन उचल्यात. 44 तठे जेवण खाणारा माणसेच फक्त
पाच हजार व्हतात.

### येशु पाणीवर चालस

*(मत्तय १४:२२-३३; योहान ६:१५-२१)*

45 मंग येशुनी शिष्यसले सांगं, “तुम्हीन नावमा बशीन
समुद्रपलीकडला बेथसैदा गावमा जा, मी लोकसले सोडीसन येस.”
46 मंग तो लोकसले निरोप दिसन डोंगरवर प्रार्थना कराले गया.
47 अनी संध्याकाय व्हयनी तवय येशु काठवर एकलाच व्हता अनी
नाव समुद्रना मध्यभागी व्हती. 48 तवय त्या त्याले नावमा आवकाया
करतांना दखाईनात, कारण वारा विरूध्द दिशाना व्हता; पहाटले तीन
ते सव वाजाना दरम्यान तो समुद्रना पाणीवरतीन चालीन त्यासनाजोडे
वना. अनी त्यासना पुढे जावाना त्याना ईचार व्हता, 49 पण त्या त्याले
पाणीवरतीन चालतांना दखीसन घाबरी गयात अनी “हाई भूत शे!”
अस समजीन त्या वरडाले लागना.
50 कारण त्या सर्व त्याले दखीसन घाबरी जायेल व्हतात.
तवय येशु त्यासले बोलना, “धीर धरा, भिऊ नका, मी शे!” 51 मंग
तो त्यासनाजोडे नावमा गया, अनी वारा शांत व्हयना, तवय त्यासले
आश्चर्य वाटनं. 52 कारण त्या पाच हजार लोकसले जेवण खावाडानी
गोष्ट त्यासले समजेल नव्हती कारण त्यासनं मन कठोर व्हयेल व्हतं.

### येशु गनेसरेत गावना आजारीसले बरं करस

*(मत्तय १४:३४-३६)*

53 त्या समुद्रपलीकडला गनेसरेत प्रांतमा किनारावर पोहचनात अनी
तठे त्यासनी नाव बांधीसन ठेई. 54 त्या नावमातीन उतरताच येशुले
लोकसनी वळखं. 55 अनी त्या आसपासना परीसरमा जठे कोठे माहीत
पडनं, तो शे, तठे तठे त्या आजारी लोकसले खाटवर उचलीसन पयत
पयत लई जायेत. 56 तो गाव, शहर, खेडापाडामा जठे कोठे जाये तठे
लोके आजारीसले बजारमा लई जाईन ठि देत अनी तुना कपडाले हात
लावु दे असा त्या त्याले ईनंती करेत अनी जितलासनी त्याले हात लाया
तितला बरा व्हई गयात.

## 7

### पुर्वजसना परंपराना प्रश्न

*(मत्तय १५:१-९)*

1 मंग परूशी अनं शास्त्री लोके यरूशलेमवरतीन ईसन येशुजोडे गोया
व्हयनात.
2 त्यासनी त्याना काही शिष्यसले अशुध्द हाततीन म्हणजे
परूशीसना नियमना मायक हात नही धोता जेवण करतांना दखेल व्हतं.
3 कारण परूशी अनी यहुदी लोके पुर्वजसंना परंपरानुसार हात निट
धवाशिवाय जेयेत नही. 4 त्या बाजार मातीन जे लयेत ते धवाशिवाय
खायेत नही. अनी जसं कटोरा, घडा, तांबाना भांडा घशेत अनं धोयेत
असा बराच नियम त्यासनी स्विकारेल व्हतात.
5 यावरतीन परूशीसनी अनी शास्त्रीसनी येशुले ईचारं, “तुमना शिष्य
अशुध्द हातघाई जेवतस, त्या पुर्वजसंना रितीरिवाजाप्रमाणे का बरं नही
चालतस?”
6 येशुनी उत्तर दिधं,
“तुमना मायक ढोंगीसबद्दल यशया संदेष्टानी चांगलाच संदेश देयल शे,
तो असा शे की,
या लोके तोंडघाई मना सन्मान करतस पण त्यासनं मन मनापाईन
दुर शे?
7 त्या स्वतःना नियमसले

---

✡ **6:34** ६:३४ मत्तय ९:३६ * **6:37** ६:३७ दोनशे चांदिना शिक्का म्हणजे दोनशे दिननी मजुरी

देवना नियम बनाडीन शिकाडतस
अनी वायफळ मनी भक्ती करतस."
8 "तुम्हीन देवनी आज्ञा बाजुले करीसन माणससनी बनाडेल
रितीरिवाजले चिटकी राहतस."
9 आखो येशु त्यासले बोलना, "तुम्हीन आपला रितीरिवाज
पाळाकरता देवनी आज्ञा मोडाना चांगलाच मार्ग शोधी काढेल शे!
10 कारण मोशेनी अशी आज्ञा देयेल शे की, 'आपला बाप अनी माय
यासना मान राख,' अनी, 'जो कोणी बाप किंवा मायनी निंदा करी त्याले
मारी टाका.' 11 पण तुम्हीन म्हणतस जर कोणी आपला माय बापले
अस सांगतस की, मी तुमले मदत करतु पण जे मनाकडे शे, 'ते मी देवले
अर्पण कराले ठेयेल शे.' 12 तर त्याले आपला माय किंवा बापले मदत
नही करानं कारण भेटी जास. 13 तसच तुम्हीन आपला रितीरिवाज
चालु ठेवाकरता देवनं वचन मोडतसं अनी असा बऱ्याच गोष्टी करतस."

### मनुष्यले अशुध्द करनाऱ्या गोष्टी
*(मत्तय १५:१०-२०)*

14 तवय येशुनी परत लोकसनी गर्दीले बलाईन सांगं, "तुम्हीन सर्व,
मनं ऐकी ल्या, अनं समजी ल्या." 15 "अशी कोणतीच वस्तु नही
जी बाहेरतीन माणुसमा जास अनी त्याले अपवित्र करस, तर जे माणुस
मातीन निंघस ते त्याले अशुध्द करस, 16 ज्यासले कान शेतस त्यासनी
निट ऐकी ल्या."*
17 लोकसनी गर्दीले सोडीन जवय येशु घर गया, तवय शिष्यसनी
त्यानी सांगेल दृष्टांतना अर्थ ईचारा. 18 येशु त्यासले बोलना, "तुम्हीन
पण इतला आडानी शेतस का? जे काही बाहेरतीन माणुसमा जास ते
त्याले अशुध्द करू शकस नही हाई तुमले समजत नही का? 19 ते
मनमा नही जास तर ते पोटमा जास अनी ते शरिरमातीन बाहेर पडस."
अस सांगीसन त्यानी सर्व प्रकारनं अन्न शुध्द ठरावं.
20 आखो तो बोलना, "जे माणुस माईन निंघस तेच माणुसले अशुध्द
करस. 21 कारण मझारतीन म्हणजे माणुसना मनमातीन दुष्ट ईचार
निंघतस. अनैतीक कार्य, खुन, चोरी, 22 व्यभिचार, लोभ, दुष्टता,
कपटपणा, जळाऊपणा, चुगलीखोर, गर्विष्टपणा, मुर्खपणा. 23 ह्या सर्व
वाईट गोष्टी माणुस मातीन बाहेर निंघतस त्याच त्याले अशुध्द करतस."

### गैरयहूदी बाईना ईश्वास
*(मत्तय १५:२१-२८)*

24 मंग येशु तठेन ऊठीसन सोर प्रांतना सिमावरला परीसरमा गया.
तठे तो एक घरमा गया हाई कोणलेच समजाले नको अस त्यानी ईच्छा
व्हती, पण त्याले लपीन राहता वनं नही. 25 तवय एक बाईनी येशुबद्दल
ऐकं, तिना धाकली पोरले दुष्ट आत्मा लागेल व्हता, ती बाई लगेच
ईसन त्याना पाया पडनी. 26 ती गैरयहूदी बाई व्हती, सिरियाना फेनीके
प्रांतमा तिना जन्म व्हयेल व्हता. तिनी येशुले ईनंती करीसन सांगं, मनी
पोर माधला दुष्ट आत्मा काढा. 27 तवय येशुनी उत्तर दिधं, "पहिले
पोऱ्यासले तृप्त होऊ दे. त्यासनं जेवण काढीसन कुत्रासले देनं बराबर
नही शे."
28 तवय ती त्याले बोलनी, हाई खरं शे, "गुरजी, तरी कुत्रा पण
पोऱ्यासना हातमाईन मेजनाखाल पडेल उष्ट खातस."
29 तवय येशुनी तिले सांगं, "तुनं बोलनं पटनं, शांतीमा जाय तुना
पोर मधला दुष्ट आत्मा निंघी गया!"
30 मंग ती घर गई; तिले दखायनं की, पोर आंथरून वर निजेल शे
अनं तिना मधला दुष्ट आत्मा निंघी जायेल शे.

### येशु मुका बहिरा माणुसले बरं करस

31 तवय येशु सोर प्रांतमाईन निंघीसन सिदोनना रस्तावरतीन
गालीलना समुद्रकडतीन दकापलीस म्हणजे दहा गावसना शहरले वना.
32 तठे काही लोकसनी येशुकडे एक मुका बहिरा माणुसले आनं अनी
तुम्हीन त्यानावर हात ठेवा, अशी त्यासनी त्याले ईनंती करी. 33 तवय
येशु त्याले गर्दी माईन बाजुले लई गया त्याना कानमा बोटे टाकात नंतर
तो थुंकना अनी त्या थुंकीना त्याना जिभले स्पर्श करा. 34 अनं येशु
स्वर्गकडे दखीसन दम लाईन, त्या माणुसले बोलना, "इफ्फाता" म्हणजे
"मोकळा व्हय!"
35 तवय त्याना कान मोकळा व्हयना अनं त्यानी जिभनी गाठ
मोकळी व्हईन तो स्पष्ट बोलाले लागना. 36 तवय हाई कोणलेच सांगानं
नही अस येशुनी त्याले बजाईन सांगं पण त्यानी हाई गोष्ट सर्वासले
सांगी दिधी. 37 तवय ज्यासनी ऐकं त्या भलताच चकित व्हईसन
बोलनात की, "हाऊ सर्वकाही कितलं चांगलं करी लेस!" अनं "हाऊ
बहिरासले ऐकानी अनं मुकासले बोलानी शक्ती देस!"

## 8

### येशु चार हजार लोकसले जेवण देस
*(मत्तय १५:३२-३९)*

1 त्या दिनले लोकसनी मोठी गर्दी जमेल व्हती अनी त्यासनाकडे
खावाकरता काहीच नव्हतं, म्हणीन येशुनी आपला शिष्यसले बलाईसन
त्यासले सांगं, 2 "माले या लोकसनी किव ई ऱ्हायनी कारण त्या तीन
दिनपाईन मनासंगे शेतस अनी आते त्यासनाजोडे खावाकरता काहीच
नही. 3 अनी जर मी त्यासले भूक्या तिश्या घर जावाले लाई दिधं. तर
त्या वाटमाच काल्या वाल्या करतीन कारण त्यासमा बराचजन दूरतीन
येल शेतस."
4 त्याना शिष्यसनी त्याले सांगं, "आठे ओसाड प्रदेशमा ह्या पोटभर
खातीन इतलं जेवण कोण लई ई?"
5 येशुनी त्यासले ईचारं, "तुमना जोडे कितल्या भाकरी शेतस?"
त्यासनी सांगं, "सात."
6 मंग येशुनी लोकसले जमीनवर बसाले सांगं, त्या सात भाकरी
लिसन देवना आभार मानात अनी त्या मोडीसन शिष्यसना जोडे
वाढाकरता दिध्यात अनी त्यासनी लोकसले वाढ्यात. 7 त्यासनाजोडे
काही धाकला मासापन व्हतात येशुनी त्यावर देवना आभार मानीन त्या
पण वाढाले सांगात. 8 सर्वासनी पोटभर जेवण करं अनी जे उरनं त्याना
सात टोपला भऱ्यात. 9 तठे जेवणकरता जवळजवळ चार हजार माणसे
व्हतात. मंग येशुनी त्यासले घर जावाले लायं. 10 अनी तो आपला
शिष्यसंगे नावमा बशीन दल्मनुथा प्रांतमा गया.

### परूशीसनी येशुले चमत्कार दखाडाले सांगं
*(मत्तय १६:१-४)*

11 ✡मंग परूशी तठे ईसन येशुसंगे वाद घालाले लागनात अनी त्यानी
परिक्षा दखाकरता त्यासनी त्याले सांगं, आकाशमा आमले काहीतरी
चमत्कार दखाड. 12 ✡तवय त्याना आत्मा भलताच दुःखायना अनं
येशु बोलना, "हाई पिढीना लोके चमत्कार का बर मांगतस? मी तुमले

* **7:16** ७:१६ हाई वचन, जुना ग्रंथसमा वाचामा येल नही शे. ✡ **8:11** ८:११ मत्तय १२:३८; लूक ११:१६ ✡ **8:12** ८:१२ मत्तय १२:३९; लूक ११:२९

खरंखरं सांगस हाई पिढीना लोकसले कोणताच चमत्कार दखाडामा
येवाव नही!”
13 तो त्यासले सोडीसन परत नावमा बशीन समुद्रना पलीकडे गया.

### परूशी अनं हेरोद यासना खमीर
*(मत्तय १६:५-१२)*

14 नंतर शिष्य भाकरी लेवाले ईसरी जायल व्हतात अनी नावमा
त्यासनाजोडे फक्त एकच भाकर व्हती. 15 ✡मंग येशुनी त्यासले
बजाईन सांगं की, “परूशी *लोकसना अनी हेरोद राजाना खमीर† पाईन
सावध रहा.”
16 तवय त्या एकमेकसले बोलू लागनात, “आपलाजोडे भाकरी
नही शेतस म्हणीसन त्याले आपलाले हाई सांग.”
17 येशुनी हाई वळखीन त्यासले सांगं, तुमना जोडे भाकरी नही
शेतस मंग चर्चा का बरं करतस? तुमले अजुन समजनं नही का?
अनी ध्यानमा बी नही वनं का? तुमनं मन कठोर व्हई जायल शे का?
18 ✡डोया राहिसन तुम्हीन दखंतस नही का? कान राहिसन तुम्हीन
ऐकतस नही का? तुमले याद नही का?
19 जवय मी पाच हजार लोकसले पाच भाकरी मोडीसन दिध्यात
तवय तुम्हीन जे उरेल व्हतं त्याना कितल्या डालक्या उचल्यात? त्या
बोलनात, बारा.
20 येशुनी ईचारं, “काय तुमले याद नही जवय मी चार हजार
लोकसकरता सात भाकरी मोडात तवय तुम्हीन कितला टोपला
भऱ्यात?” त्या बोलनात, “सात.”
21 तवय त्यानी त्यासले ईचारं, “तुमले अजुन नही समजनं का?”

### येशु बेथसैदा गावमा आंधयाले बरं करस

22 मंग त्या बेथसैदा गावमा वनात तवय लोके येशुजोडे एक आंधया
माणुसले लई वनात अनी तुम्हीन याले स्पर्श करा अशी त्याले ईनंती
कराले लागनात. 23 तवय येशु त्या आंधया माणुसना हात धरीसन त्याले
गावना बाहेर लई गया अनी त्याना डोयाले थुंक लाईन त्यानावर हात
ठेईन त्याले ईचारं, “तुले काही दखाई राहीनं का?”
24 तवय तो वर दखीसन बोलना, “मी माणससले दखु शकस पण
त्या माले चालता फिरता झाडसना मायक दखाई राहिनात.”
25 नंतर येशुनी त्याना डोयासवर परत हात ठेवात. तवय त्याना
डोया उघडी गयात अनी त्याले सर्व स्पष्ट दखावाले लागणं अनी तो बरा
व्हयना. 26 मंग येशुनी त्याले घर धाडतांना सांगं, “परत या गावमा
जाऊ नको.”

### येशु हाऊ देवनी निवडेल तारणहार
*(मत्तय १६:१३-२०; लूक ९:१८-२१)*

27 तवय येशु अनं त्याना शिष्य फिलीप्पाना कैसरियाना गावसमा
जावाले निंघनात. तवय त्यानी शिष्यसले ईचारं, “लोके माले काय
म्हणतस की, मी कोण शे?”
28 ✡तवय त्यासनी उत्तर दिधं, “काही लोके तुमले बाप्तिस्मा
करनारा योहान, काहीजण तुमले एलिया अनं काहीजण तुमले संदेष्टास
माधला एक, अस म्हणतस.”
29 ✡त्यानी त्यासले ईचारं, “पण तुमले काय वाटस मी कोण शे?”
तवय पेत्रनी त्याले उत्तर दिधं, “तुम्हीन तर तारणहार शेतस.”
30 मंग येशुनी त्यासले बजाईन आज्ञा करी की, “मनाबद्दल कोणलेच
काही सांगु नका.”

### मृत्यु अनं पुनरूत्थानबद्दल येशुनी करेल भविष्य
*(मत्तय १६:२१-२८; लूक ९:२२-२७)*

31 येशु शिष्यसले अस शिकाडू लागना की; “मनुष्यना पोऱ्याले
भलताच दुःख भोगना पडतीन, वडील लोके, मुख्य याजक अनं शास्त्री
लोके त्याले धिक्कारतीन, त्याले मारी टाकतीन, पण तीन दिन नंतर तो
परत जिवत व्हई.” 32 हाई गोष्ट त्यानी उघडउघड सांगी दिधी, त्यामुये
पेत्र त्याले बाजूले लई गया अनी त्याले धमकाडीन बोलणा, अस नही
व्हवु शकस. 33 तवय येशुनी शिष्यकडे वळीसन दखं अनं तो पेत्रले
धमकाडीन बोलना, “अरे सैतान, मना पुढतीन चालता व्हय,” कारण
“देवन्या गोष्टीसकडे तुनं ध्यान नही, माणससना गोष्टीकडे शे!”
34 ✡मंग येशुनी लोकसनी गर्दीसंगे शिष्यसले बी जोडे बलाईन
सांगं, “जर कोणले मनामांगे येवानी ईच्छा शे, तर त्याले आत्मत्याग
कराना अनी स्वतःना क्रुसखांब उचलीसन मनामांगे येवानं. 35 ✡कारण
जो कोणी स्वतःना जीव वाचाडाले दखी, तो त्याले गमाडी; अनी
जो कोणी मनाकरता अनं वचनकरता जीव गमाडी तो त्याले वाचाडी.
36 माणुसले जगनं सर्व सुख भेटनं अनी स्वतःना जीव गमाडा तर त्याले
काय फायदा व्हई? 37 किंवा माणुस आपला जीवना बदलामा काय देवु
शकस? 38 ह्या पापी अनं व्यभिचारी पिढीमा ज्याले मनी अनी मना
वचननी लाज वाटी, मनुष्यना पोऱ्या, स्वर्गदेवदूतससंगे आपला पिताना
गौरवमा ई, तवय त्याले बी त्यानी लाज वाटी.”

# 9

1 येशुनी त्यासले सांगं, “मी तुमले सांगस की, ह्या येळले तुमनामा
काहीजण असा उभा शेतस ज्या देवनं राज्य मोठा सामर्थ्यमा येतांना
दखाशिवाय त्यासले मरणना अनुभव येवावुच नही.”

### येशुनं रूपांतर
*(मत्तय १७:१-१३; लूक ९:२८-३६)*

2 ✡मंग येशु सव दिन नंतर पेत्र, याकोब अनी योहान यासले उंच
डोंगरवर एकांतमा लई गया. अनी त्यासनासमोर येशुनं रूप बदलनं,
3 त्याना कपडा धवळा व्हईसन ईतला चमकाले लागणात की, पुरी
पृथ्वीवर असा एक बी धोबी नही जो धोईसन ईतला धवळा कपडा
करी. 4 तवय तिन्ही शिष्यसनी दखं की एलिया अनी मोशे येशुसंगे
बोली राहींतात. 5 तवय पेत्रनी येशुले सांगं, “गुरजी, आपण आठे
राहसुत तर कितलं भारी व्हई! आपण आठे तीन मंडप बनाडुत, एक
तुमनाकरता, एक मोशेकरता अनी एक एलियाकरता” 6 तो हाई बोलानं
म्हणीन बोली गया कारण त्याले समजी नही राहिंत की काय बोलु कारण
त्या सर्व घाबरी गयतात.
7 ✡तवय ढग उतरनात त्यामा त्या झाकाई गयात अनी ढगमातीन
अशी वाणी व्हईनी की, “हाऊ मना प्रिय पोऱ्या शे, यानं तुम्हीन ऐका!”
8 मंग लगेच त्यासनी आजुबाजूले दखं पण त्यासले येशुनाशिवाय दुसरं
कोणीच दखायनं नही.

✡ **8:15** ८:१५ लूक १२:१ * **8:15** ८:१५ परूशी परूशी हाऊ एक पंथ व्हता † **8:15** ८:१५ परूशी अनी हेरोद राजानं चुकीनं शिक्षण ✡ **8:18** ८:१८ मार्क ४:१२
✡ **8:28** ८:२८ मार्क ६:१४,१५; लूक ९:७,८ ✡ **8:29** ८:२९ योहान ६:६८,६९ ✡ **8:34** ८:३४ मत्तय १०:३८; लूक १४:२७ ✡ **8:35** ८:३५ मत्तय १०:३९; लूक १७:३३; योहान
१२:२५ ✡ **9:2** ९:२ २ पेत्र १:१७,१८ ✡ **9:7** ९:७ मत्तय ३:१७; मार्क १:११; लूक ३:२२

9 नंतर त्या डोंगरवरतीन उतरी राहींतात तवय येशुनी त्यासले आज्ञा
करी की, “तुम्हीन जे दखं ते मनुष्यना पोऱ्या मरानंतर परत जिवत व्हत
नही तोपावत कोणलेच सांगु नका.”
10 हाई आज्ञा त्यासनी मान्य करी पण, “मरानंतर परत जिवत व्हनं,
याना अर्थ काय?” असा त्या एकमेकसले ईचारू लागनात. 11 ✡मंग
त्यासनी येशुले ईचारं, “एलिया पहिले येवाले पाहिजे अस शास्त्री का
बर म्हणतस?”
12 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “पहिले एलिया ईसन सर्वकाही तयार
करी हाई खरं शे. पण तरी मनुष्यना पोऱ्याबद्दल अस का बर लिखेल शे
की, तो भलतं दुःख सहन करी अनी त्याले नाकारतीन? 13 मी तुमले
सांगस की, एलिया येल शे अनी त्यानाबद्दल जसं लिखेल शे, तसच
लोकसनी त्यासले पटी तसं त्यानासंगे करं.”

### येशु दुष्ट आत्मा लागेल पोऱ्याले बरं करस
*(मत्तय १७:१४-२१; लूक ९:३७-४३)*

14 नंतर त्या बाकीना शिष्यसजोडे वनात तवय त्यासना आजुबाजू
लोकसनी गर्दी शे अनी त्यासनासंगे शास्त्री लोक वाद करी राहिनात अस
त्यासनी दखं. 15 तवय येशुले दखताच सर्व लोके चकीत व्हयनात अनी
त्यानाकडे पयतच जाईसन त्याले नमस्कार करा.
16 मंग येशुनी त्याना शिष्यसले ईचारं, “तुम्हीन त्यासनासंगे काय
वाद करी राहींतात?”
17 गर्दीमातीन एकनी उत्तर दिधं, “गुरजी, मना पोऱ्याले दुष्ट आत्मा
लागेल शे, तो बोलु शकस नही, म्हणीन मी त्याले तुमनाकडे लयेल
शे. 18 जठे कोठे त्याले हाऊ दुष्ट आत्मा लागस तठे तो त्याले धरीन
उपटस, अनी याना तोंडमा फेस येस तवय हाऊ दातमिळ्या खास अनं
वातडा व्हस म्हणीन तो दुष्ट आत्मा काढाले मी तुमना शिष्यसले सांगं,
पण त्यासनाघाई तो निंघी नही राहीनं.”
19 येशुनी शिष्यसले उत्तर दिधं, “कितला अईश्वासी लोके शेतस
तुम्हीन! कोठपावत मी तुमनासंगे ऱ्हासु? कोठपावत तुमनं सहन करू?
त्या पोऱ्याले मनाकडे लई या!”
20 त्या त्याले येशुजोडे लई वनात.
तवय येशुले दखताच तो दुष्ट आत्मा त्या पोऱ्याले पिळाले लागना
तसाच तो पोऱ्या जमीनवर पडीन लोळाले लागना अनी त्याना
तोंडमाईन फेस पण निंघाले लागना.
21 तवय येशुनी त्याना बापले ईचारं, “कवयपाईन याले अस व्हई
राहीनं?” त्यानी उत्तर दिधं, “तो धाकला व्हता तवयपाईन अस व्हई
ऱ्हायनं.” 22 “दुष्ट आत्मानी याले मारा करता बराचदाव ईस्तवमा अनी
बराचदाव पाणीमा टाकीन माराना प्रयत्न करा. तुमले काय करता ई तर
आमनावर दया करीसन मदत करा!”
23 येशु त्याले बोलना, “हो, मी करू शकस! ईश्वास धरनारासकरता
सर्वकाही शक्य शे.”
24 तवय त्या पोऱ्याना बापना डोयामा पाणी वनं अनी तो वरडीन
बोलना, “मी ईश्वास धरस; पण मना ईश्वास भक्कम नही, मना ईश्वास
वाढाले माले मदत कर!”
25 त्या येळले येशुनी दखं की अजुन लोकसनी गर्दी ई राहिनी
तवय त्यानी त्या दुष्ट आत्माले धमकाडीन सांगं, “मुका बहिरा आत्मा
यानातीन निंघ अनी मी तुले आज्ञा देस परत फिरीन कधीच यानामा घुसू
नको!”
26 तवय दुष्ट आत्मा वरडीन, त्या पोऱ्याले पिळीन निंघी गया अनी
तो पोऱ्या मरेलना मायक पडी ऱ्हायना हाई दखीसन बराच लोक बोलू
लागनात “हाऊ तर मरी गया!” 27 पण येशुनी त्याले हाथ धरीन ऊठाडं
अनी तो ऊठीसन उभा ऱ्हायना.
28 जवय येशु घरमा वना तवय एकांतमा त्याना शिष्यसनी त्याले
ईचारं, “आमनाघाई त्या पोऱ्यामाईन दुष्ट आत्मा का बर नही निंघना?”
29 येशुनी त्यासले सांगं, “ह्या प्रकारना दुष्ट आत्मा प्रार्थनाशिवाय
दुसरा कसा घाईच निंघत नही.”

### येशु परत त्याना मृत्युबद्दल बोलस
*(मत्तय १७:२२-२३; लूक ९:४३-४५)*

30 नंतर येशु अनी त्याना शिष्य तठेन निंघीन गालीलमातीन जाई
राहींतात. पण तो कोठे शे हाई कोणलेच माहित पडाले नको अशी
येशुनी ईच्छा व्हती, 31 कारण तो त्याना शिष्यसले शिकाडी राहिंता;
तो त्यासले बोलना की, “मनुष्यना पोऱ्याले मनुष्यसना हातमा सोपी
देतीन; त्या त्याले मारी टाकतीन अनी मारी टाकावर तीन दिन नंतर तो
परत जिवत व्हई.”
32 पण त्यासले येशुनी हाई गोष्ट समजनी नही अनी त्याना अर्थ काय
शे, हाई त्याले ईचारानी त्यासनी हिम्मत व्हई नही राहिंती.

### सर्वात मोठा कोण?
*(मत्तय १८:१-५; लूक ९:४६-४८)*

33 मंग त्या कफर्णहुम गावले वनात; अनी त्या घरमा व्हतात तवय
येशुनी शिष्यसले ईचारं, “वाटमा तुम्हीन कोणती बातवर चर्चा करी
राहींतात?”
34 ✡पण त्या गप्पच राहीनात, कारण सर्वात मोठा कोण शे हाई
बातवर त्या एकमेकससंगे वाटमा चर्चा करी राहींतात. 35 ✡नंतर येशु
खाल बसना अनी त्यानी त्याना बारा शिष्यसले बलाईन सांगं, “ज्याले
सर्वात मोठं व्हवानी ईच्छा शे त्यानी सर्वात शेवट अनी सर्वासना सेवक
बनीन ऱ्हावानं.” 36 मंग त्यानी एक धाकला बाळले उचलीन त्यासना
मझार त्याले ठेयं अनी त्याले कवटाळीन त्यासले सांगं, 37 ✡“जो
कोणी मना नावतीन असा बाळसपैकी एकना स्विकार करस तर तो
माले स्विकारस, अनी जो कोणी मना स्विकार करस, तर तो माले नही
तर ज्यानी माले धाडेल शे त्याना स्विकार करस.”

### जो आपला विरोधमा नही तो आपलाच शे
*(लूक ९:४९-५०)*

38 योहाननी येशुले सांगं, “गुरजी, तुमना नावतीन एक माणुसले
आम्हीन दुष्ट आत्मा काढतांना दखं, तवय त्याले तु अस करानं नही
अस आम्हीन त्याले सांगं, कारण तो आपलामाधला नव्हता.”
39 येशु त्यासले बोलना, “त्याले रोखु नका,” कारण जो कोणी
मना नावतीन चमत्कार करी अनी लगेच मनी निंदा करी असा कोणी
नही. 40 ✡कारण जो आपला विरोधमा नही तो आपला संगेनाच
शे. 41 ✡तुमले ख्रिस्तना लोके समजीसन जो कोणी पेवाले प्याला
भरीन पाणी दि तर मी तुमले खरंखरं सांगस की, त्यानं प्रतिफळ त्याले
भेटाशिवाय ऱ्हावाव नही.

---

